# सख्य महिला मार्गदर्शन केंद्र

स्त्री सबळीकरणातून स्त्रीपुरूष समानता

# हुंकार

वर्ष : १२ वे अंक : ३६ फेब्रुवारी २०२४


महिला मार्गदर्शन केंद्र

सख्य

**हिंसा थांबवा**

या अंकात...


तिला सामावून घ्या...
बाई घराबाहेर पडली आहे...
Message of President
Appreciation Letter
Women's Participation...
या दशकातील स्त्री आव्हाने...
Count her in...
आई असते जन्माची शिदोरी...
Messages of Ex-staff
सहामाही अहवाल
भरोसा सेल....
भारतात लैंगिक समानतेला...



• प्रकाशक •
नॅन्टी लोपीस

• संपादक मंडळ •
शालिनी जाधव
वेरोणिका ब्रिटो
चेरील परेरा
लविना फर्नांडिस

• सख्य परिवार •
नॅन्टी लोपीस
शालिनी जाधव
विद्या पाटील
रुशीला रिबेलो
लविना फर्नांडिस
निता चव्हाण,
बेसेलिना मच्याडो
ब्युटी शेख, रेखा घोषा
माया मोरे, पार्वती दादोडा
आशा तुपे, पुष्पा पवार
अनिता गावीत
रंजना वावरे, चेरील परेरा


**प्रकाशकीय**

## तिला सामावून घ्या...

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे २०२४ चे घोष वाक्य 'Count her in Inspire Inclusion'

आधुनिक काळात जग एवढ्या झपाट्याने वेगवेगळ्या स्तरावर प्रगती करत आहे. महिला तळागाळातून अवकाशयानापर्यंत पोहचल्या असतानादेखील, आज पुन्हा एकदा सर्वसमावेशकाची गरज का वाटावी? रुढी परंपरामध्ये जखडलेली सामाजिक परिस्थिती याला अडसर बनली आहे का? असे अनेक प्रश्न डोकावतात.

या मासिकामध्ये डॉ. प्रभा यांनी त्यांच्या लेखामध्ये लिंगभाव आणि संविधानाने स्त्रीला मुक्त करण्याच्या दृष्टीने दिलेले मानवी अधिकार याविषयी उहापोह करतात की, महिला आपला अधिकार अजमावण्याच्या दृष्टीने संविधानाने दिलेली मूल्ये, स्वातंत्र्य, समता, विश्वबंधूता सर्वधर्मस्नेहभाव, न्याय अंगीकारणे काळाची गरज आहे.

महिला आणि मुलींसाठी सुरक्षितता निर्माण करणे, जिथे महिला तणाव अत्याचाराची भीती नसेल, सर्वसमावेशक वातावरण असेल, जेथे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आनंद घेता येईल आणि सर्वांना सामावून घेता येईल.

प्रो. विभूती यांनी 'नारी शक्ती वंदना अभियान' याचा उहापोह करून राजकीय सहभागा-मधील महिला आरक्षण जणू तोंडाला पाने पुसली आहेत. त्यापुढे आव्हान करीत आहेत की सामुहिक प्रयत्नांनी आपल्याला अधिक समावेशक, न्याय राजकीय आणि प्रतिनिधीक लोकशाहीत वाटा मिळवण्यासाठी प्रवास सुरू ठेवणे गरजेचे आहे.



शिक्षणामुळे महिलांनी वेगवेगळ्या स्तरावर बाजी मारून आपले अस्तित्व सिद्ध केले आहे परंतु बहुसंख्य समाजाची स्थिती ही विदारक आहे. आणि म्हणून सर्वसमावेशकाची गरज आहे. समाजातील ह्या परिस्थितीला भेदण्याचे काम अनेक संस्था, संघटना करत आल्या आहेत. एकीकडे कुत्रीम बुद्धीमत्ता, विकसित झालेले तंत्रज्ञान आणि सामाजिक, राजकीय परिस्थितीमुळे महिलांच्या विकासामध्ये बाधा येत आहे. आजही मुली जन्मताच गहाळ होत आहेत. आणि वारसाचा दिवा ह्याची वाट पाहत असतात.

महिला आणि मुलींसाठी सुरक्षितता म्हणजे काय? जिथे महिला आणि मुलींना शारिरीक व भावनिक सुरक्षितता आहे, अती तणाव नाही, अत्याचाराची भिती नाही. कोणत्याही प्रकारचे

(पान ३ वर)


सख्य कार्यालय : सिल्वेस्टर स्मृती, पहिला मजला, पोलीस चौकीच्यासमोर, कळंब रोड, निर्मळ नाका, नालासोपारा (प.) ता. वसई, जि. पालघर, पिन - ४०१ ३०४ वेळ : सोमवार ते शनिवार सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.००
मोबाईल : 9890312402, Email : sankhya_87@rediffmail.com
Website : www.sakhyawgc.org, Facebook : Sakhyawomen'sGuidance Cell
'सख्य' विस्तारीत शाखा : मेंटल हॉस्पिटल रोड, धर्मवीर नगर, ठाणे - ४०० ६०१.
वेळ - सोमवार ते शनिवार सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० वाजता मोबाईल : 9136090564

- वसई विरार शहर महानगरपालिका रुग्णालय,तुळींज, नगिनदास पाडा, नालासोपारा (पुर्व)पालघर -४०१२०९
- सर डी. ए. पेटीट रुग्णालय, पारनाका, वसई (प.)
- ००५, नवीन प्रशासकीय इमारत, महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद पालघर कोळगांव.

# माणिकपूर अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

मुख्य कार्यालय : माणिकपूर, वसई रोड (प.), ता. वसई, जि. पालघर
E-mail : mucs.world@gmail.com
संस्थापक : रेव्ह. फा. रेमन न्युबिओला, स्थापना : ३० नोव्हेंबर १९५९ रजि. नं. २५८६०
कार्यक्षेत्र : राज्यस्तरीय, ठाणे, पालघर, मुंबई व रायगड जिल्हा

---

**माहे डिसेंबर २०२३ अखेरील सांपत्तिक स्थिती**

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण ठेवी | रु. ४०७.४२ कोटी | एकूण कर्ज | रु. २०२.३३ कोटी |
| एकूण गुंतवणूक | रु. ३३२.६४ कोटी | समिश्र व्यवसाय | रु. ६०९.७५ कोटी |

**● आपले नम्र ●**

**श्री. मॅकलस जॉन घोन्सालवीस - अध्यक्ष  श्री. दिनेश गजानन पाटील - उपाध्यक्ष**

**● संचालक मंडळ सदस्य●**

श्री. निकोलस मायकल लोपीस
श्री. मायकल फ्रान्सिस घोन्सालवीस
श्री. मायकल सायमन कोरीया
श्री. जयप्रकाश मनोहर पाटील
सौ. हेलन ऑस्टीन डिमेलो
श्री. शशिकांत गंगाधर बागूल
श्री. ख्रिस्तोफर ॲन्थोनी घोन्सालवीस
श्री. फ्रान्सिस मनवेल लोपीस
श्री. विवेकानंद बाळकृष्ण पाटील
श्री. क्रांती हरिश्चंद्र मानकर
श्री. अवधूत गोपाळ वर्तक
सौ. अन्सेला रेमन लोपीस
श्री. हेमंत हरिभाऊ राऊत
श्री. हितेश नंदकुमार वर्तक

# एकता सहकारी पतपेढी मर्यादित (शिरलय आगाशी)

रजि. क्र. टी.एन.ए. / (व्हिएसआय) / आरएसआर (सीआर) / ११७३ / १९९९-२०००

**सभासदांसाठी मोबाईल बँकींग सुविधा**
**(IMPS, NEFT, RTGS)**

**एकता निधी ठेव - १२ महिने**
**व्याजदर ७.२५% ७.७५% (ज्येष्ठ नागरिक)**

**दागिना कर्ज : १० ग्रॅमवर अधित्तम रु. ४०,४४४/-@८.२%**

## ठेवी

मुदत ठेव / एकता मुदत / आवर्त ठेव / मासिक परतावा

| | सर्व साधारण | ज्येष्ठ नागरिक |
|---|---|---|
| ३० ते १८० दिवस | ४.५० | ५.०० |
| १८१ ते १२ महिने | ६.०० | ६.२५ |
| १३ ते ३६ महिने | ६.७५ | ७.०० |
| नवीन कर्ज योजना | | |

## कर्ज

| कर्ज | व्याजदर |
|---|---|
| वैयक्तिक कर्ज | ११.५० |
| प्रॉपर्टी मॉरगेज कर्ज | ११.५० |
| घरबांधणी कर्ज | ९.०० |
| शॉप / गाळा / मशिनरीकर्ज | ११.०० |
| वाहन कर्ज (वैयक्तिक) | ९.५० |
| वाहन कर्ज (व्यवसाय) | १०.०० |
| शैक्षणिक कर्ज | ८.९० |
| व्यवसाय कर्ज | ११.५० |
| रिक्षा कर्ज | १४.५० |

आपले विनीत :

**श्री रॉबीन जॉन कोसेसांव**
उपाध्यक्ष

**श्री. फ्रान्सिस ना. लोपीस, अध्यक्ष**
सर्व संचालक मंडळ, सभासद व कर्मचारी वर्त

**श्री. आल्बर्ट पॉल डिसिल्वा**
सचिव

शोषण नाही. अश्या पद्धतीच सर्वसमावेशक वातावरण. जेथे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आनंद सामावून घेऊ शकतील.

'सख्य' सामाजिक संस्थेमध्ये ह्या 'सामावून घेण्याच्या' प्रक्रियेत खारीच वाटा उचलत आहे. पिडित महिला जी समुपदेशनाच्याद्वारे सख्याच्या सानिध्यात आल्याने तिला मानसिक, भावनिक आणि समाज जीवनात उभे राहण्यासाठी प्रयत्नशील राहते. जीवन जगण्यासाठी विविध प्रशिक्षण आणि कौशल्य शिबिरे घेत असताना इतर संस्थाशी जोडून त्याच्या गरजेनुसार त्यांना मार्गदर्शन आणि सहकार्य करत आहे.

त्याचप्रमाणे सुरक्षिततेच्या मुद्दयांना धरून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन महिलांच्या न्याय हक्कासाठी धोरणे व कायदे बनवण्यामध्ये सहभागीता दाखवित आहे.

महिलांच्या वेगवेगळ्या मुद्यांवर इतर संस्था संघटनाच्या सोबत कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ आणि २०१३ चा कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक अत्याचाराला पायबंद घालणारे कायदे आणून त्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने वेगवेगळ्या कॉर्पोरेट, शैक्षणिक आणि इतर संस्थामध्ये प्रशिक्षणाचे कार्य करत आहे, तसेच सरकारी क्षेत्रातील संस्थांवर `Internal Committee Member' म्हणून कार्यभार पाहात आहेत.

आपला भारत देश हा संयुक्त राष्ट्र संघाने घालून दिलेल्या 'शाश्वत विकासाचे ध्येय' पूर्ण करण्यास भागीदार आहे. सर्व स्तरातील महिलांना सुरक्षिततेचे, न्यायाचे,स्वातंत्र्याचे जीवन अनुभवता यावे म्हणून जाती-पंथ, शिक्षण या सर्वांना भेदून नवीन समाज घडवण्यासाठी सर्वांनी सज्ज होऊ या ''तिला सामावून घेऊ या.''

# बाई घराबाहेर पडली आहे...

***- सायमन मार्टिन***

आपल्याला वाटेल की बाई एकटीच घरा बाहेर पडली आहे
पाहणाऱ्याला कधीही दिसणार नाही पण बाईच्या अंगा खांद्यावर एक घर आहे.
घरात तिचा संसार आहे घराशिवाय बाई नाही बाई शिवाय घर नाही
घराच्या कपाळपट्टीवर बाईचं नाव कोरलेलं आहे,
तरीही बाई आता स्वत:ला कोंडून घेऊ इच्छित नाही घरात.
तिला ठाऊक आहे.
कितीही सजवलं धजवलं तरीही घर कधीही होत नाही आपलं,
बाई एक चालतं बोलतं घर आहे या घरातूनच जन्माला येतात अनेक घरं.
अनेक गावं, अनेक शहरं, राष्ट्र आणि अखिल विश्व
मात्र कुठल्याही इतिहासात याचा उल्लेख नाही
ज्यांनी लिहिला आहे इतिहास त्यांनी बाईला वगळूनच लिहिला आहे इतिहास. जेव्हा विचारला गेला सवाल
तेव्हा विस्कटून गेली कित्येक घरं,
बाईवरच मारला गेला शिक्का बंडखोरीचा
बाई आता नवा इतिहास घडवण्यासाठी झाली आहे सज्ज.
दिवस उगवलेला आहे, दुपार नंतर
संध्याकाळची वेळ टळून गेलेली आहे
निबिड काळोख आहे तरीही बाई एकटी घराबाहेर पडली आहे
काळोख आणि बाईचं काळीज नातं आहे
बाईला वाटत नाही अंधाराची भीती
गर्भात तर काळोखच असतो आणि त्याही अंधारातून केवळ बाईच पाहू शकते आरपार.
बाई घरातून बाहेर पडली आहे बाई सुरक्षित भिंतीच्या बाहेर पडली आहे
आता तिच्या सभोवताली भिंती नाहीत
बंद खिडक्या नाहीत आणि कुलूप लागलेला दरवाजा नाही
वर आकाश खाली धरती आहे
मोकळा श्वास घेण्यासाठी बाई घराबाहेर पडली आहे.
बाई अखंड वाहती नदी आहे
तिच्या किनाऱ्यावरच उभी राहिली आहेस नगरं
काट्याकुट्यातून दगड धोंड्यातून मार्ग काढत
जशी गेली नदी तसाच होता प्रवास बाईचा
त्या खळाळत्या प्रवाहात आपल्याला दिसलंच नाही
बाईच रक्तबंबाळ होणं निर्माण करण्यासाठी नष्ट व्हावं लागते.
नदी आणि बाई नष्ट होत आल्या आहेत.
गर्भातच बाईचा गळा घोटणारे आम्ही देवीचा उठता बसता गजर करतो
जे समजून घेतात बाईला तेच मुक्तीच्या मार्गावर प्रवास करतात
तेच देवीला ओळखू शकतात.
आजी बाई आहे, आई बाई आहे, पत्नी बाई आहे, बहीण बाई आहे, मुलगी बाई आहे
म्हणून बाई कधीच दूरची नसते ती आपल्या आतून वाहणारी रक्ताची नदी असते.
एकदा जाणून घेतलं आईला की बाईला जाणून घेणं सोप असते.

# Message of President Nirmala Institute

**- Ms. Philomena Sequeira**

Greetings!



As we come together to celebrate International Women's Day, it is with great enthusiasm and commitment that we embrace this year's theme: "Count Her In: Accelerating Gender Equality." Today, we not only acknowledge the remarkable achievements of women but also reaffirm our dedication to accelerating the pace towards a more inclusive and equal society.

This theme underscores the importance of recognizing and valuing the contributions of women in all aspects of life-be it in the workplace, at home, or within our communities. It serves as a powerful reminder that gender equality is not just a goal; it is a collective responsibility that requires our unwavering commitment and actions.

In our province, we are fortunate to be surrounded by incredible women who have made significant strides in various fields. Their accomplishments inspire us, and their resilience motivates us to create an environment where every woman and girl can thrive without limitations.

This International Women's Day, let us join hands and take concrete steps to "Count Her In." This means ensuring that women have equal opportunities, representation, and a voice in decision-making processes. It means dismantling barriers that impede progress and standing united against discrimination and injustice.

As we celebrate, let us also reflect on the work that still lies ahead. By fostering an inclusive and supportive environment, we can collectively contribute to building a future where gender equality is not just an aspiration but a reality for all.

I encourage each one of you to participate in events and initiatives that promote gender equality, celebrate the achievements of women, and raise awareness about the challenges they continue to face. Together, we can create a society where every woman is counted, heard, and empowered. This International Women's Day, let's unite to transform challenges into opportunities and shape a better future for all!

---

## ‘सख्य’ महिला दिन विशेष

मार्चमधील तो दिवस ‘आठवा’
घडवली क्रांती नारीने
आज उभी ती जग ताराया
‘सख्य’ शिकवूनी मनुजाला

मान अन् अधिकारासाठी
केला तिने संघर्ष पुरा
गाजवली तिने कर्तृत्वाने
घरापासूनी अखिल धरा

उठून आज वंदू आपण
माता-भगिनी-भार्यांना
उज्ज्वल भविष्य देऊ यत्ने
मानवतेच्या कन्यांना

जनजागरण-शिक्षण-समुपदेशन
न्याय्य लढ्याचे मार्गदर्शन
सहाय्य करता ‘सख्य’ च होते
अनेक पीडितांचा आधार

करू साकार मिळून सारे
समानतेचे स्वप्न उरातील
सबलांच्या नेतृत्वाखाली
युद्ध संपवू सर्व जगातील

**- वेदांग पाटील**

//स्त्रीशक्तिरतुल्या सदा //
रुपाली चाकणकर (राज्यमंत्री दर्जा)
Rupali Chakankar (State Minister Rank)

सत्यमेव जयते

अध्यक्षा
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
महाराष्ट्र राज्य
Maharashtra State Commission For Women
Government Of Maharashtra

क्रमांक : ममआ/२०२४/सख्य/का-०७/५५
दिनांक : १२/०१/२०२४

## शुभसंदेश

सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून काम करणाऱ्या **'संख्य महिला मार्गदर्शक केंद्र'** च्या ३७ व्या वर्धापन दिनाच्या आपणांस शुभेच्छा.

समाजातील गरजू महिलांसाठी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कायदेविषयक आणि आरोग्य क्षेत्रात असणारे आपले कठोर परिश्रम, या आपल्या समर्पणामुळे समाज घडविण्यास मदत होत आहे.

**'सामाजिक एकता हा विकासाचा मूलमंत्र आहे**
**यात आपल्या देशाचे हित सामावलेले आहे.'**

आपल्या सामाजिक भान जपणाऱ्या उपक्रमांना असेच पाठबळ मिळत राहो. आपली ही वाटचाल यापुढेही अशीच यशस्वीपणे कामकाज करीत राहो, अशी मी सदिच्छा व्यक्त करते.

सख्य महिला मार्गदर्शक केंद्राच्या वर्धापन दिन सोहळा तसेच आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या आणि आपल्या पुढील वाटचालीसाठी तसेच आपल्या स्मरणिकेस माझ्या मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा.

(रुपाली चाकणकर)
अध्यक्षा

प्रति,
निर्मला इन्स्टीटयुट,
सख्य महिला मार्गदर्शक केंद्र,
सिल्व्हर स्मृती, पहिला मजला,
कळंब रोड, नालासोपारा (प.) ४०१ ३०४.

कार्यालय:
गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग) पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.
दुरध्वनी क्र.: ०२२ २६५९०७३९
Email ID - mscmahilaayog@gmail.com www.mscw.org.in

# जिल्हा परिषद पालघर

## शुभेच्छा संदेश

प्रवीण भावसार,
जिल्हा कार्यक्रम अधिकारी (बा. क),
जिल्हा परिषद पालघर

महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद, पालघर अंतर्गत महिला व बालकांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. त्यापैकी अशा सख्य संस्थेच्या माध्यमातुन एक महिला समुपदेशन केंद्र चालवणे, ही एक उत्कृष्ट योजना आहे. पालघर जिल्हा स्तरावर सख्य महिला मार्गदर्शन केंद्र व निर्मला इन्स्टिटयूट नालासोपारा यांचे मार्फत महिला समुपदेशन केंद्र मार्च २०२३ पासून कार्यान्वयीत असून सदर समुपदेशन केंद्रामार्फत पालघर जिल्ह्यातील अनेक गरजू महिलांना त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी मोठ्या प्रमाणात मदत होत आहे. तसेच जिल्ह्यातील अंगणवाडी पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, आशा शिक्षिका यांचे अभिसरणातून महिलांच्या कौटुंबिक हिंसाचार बाबत जाणीव जागृतीचे उत्कृष्ट कामकाज होत आहे.

**संस्थेला पुढच्या वाटचालीस हार्दिक शुभेच्छा...!**

(प्रवीण भावसार)
जिल्हा कार्यक्रम अधिकारी (बा. क)
जिल्हा परिषद, पालघर

**कार्यालयाचा पत्ता :**
००५, नवीन प्रशासकिय इमारत, महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद पालघर कोळगांव
Email ID - wcdpalgharzp9@gmail.com

# TRAINING COLLEGE OF NURSING

V.S.General Hospital Thane

| | | |
|---|---|---|
| Telphone No. | 25741541 | V.S.General Hospital, Thane |
| Office / Fax | 25471409 | Tembhi Naka, Near Jain Temple Thane (W) 400 601 |
| Nursing Officer | 25473246 | Email-tcn_vsghthane@rediffmail.com, vsghthane@gmail.com |


COLLEGE OF NURSING V.S.G.H. THANE

Outward No./TCN/VSGH/ 72 /2024
Training College of Nursing
V.S.General Hospital Thane
Date : 19 /02/2024

## Appreciation Letter

It brings me utmost energy on the auspicious day of 37th Annual Day and and International women's day to appreciate the scale of work Nirmala institute is carrying out with Civil hospital thane since 2005.

Nirmala institute has always been a backbone to womanhood by empowering violence, woman empowerment, adolescent, Good touch-bad touch, thought process and demarcating social evils in its truest form of the society.

Despite of all the present social changes taking place, still women are given the lesser place in the society. So we have to work on equalising this gender inequality issue.

The cases of Domestic violence, physical abuse, family counseling which come at the Thane civil hospital, Sakhya takes the responsibility in attending such cases and helps in resolving them followed by future follow ups.

Mrs. Neeta Pawar the social worker at the Sakhy Women's guidance cell works at our Nursing College by taking training sessions based on Domestic violence, Gender biased treatment and stress management and provides guidance and advice related to the above issues. through her experience in this field of work she is capable of handling chaotic situations and deals with it expertly. Mrs. Neeta Pawar's training and shared testimonies about her clients, has also helped many of the married women who are learning at our nursing College, to go on fieldwork and apply these skills practically. We our very grateful for her continued support and work in this field and we wish Sakhya all the best for their forthcoming ventures with us.

Siddhi

**Principal**
**Training College of Nursing**
**V.S.G.H. Thane**

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

बेटी बचाओ

CO.HRMD. S14469/07.37.00/2023-24

February 12, 2024

To
Sakhya, NGO
Women's Guidance Cell

Madam,

**Valuable services by Sakhya representatives in RBI POSH committees**

Several members of Sakhya, NGO Women's Guidance Cell have been associated as External members of Complaints Committees under POSH Act 2013 constituted by the Reserve Bank of India in offices located in Mumbai, since 2016.

The Complaints Committees gratefully acknowledge the valuable services that the External members have been rendering, both in terms of their contributions to the deliberations of the Committees and in terms of conducting workshops for RBI personnel to create necessary awareness and sensitisation on POSH Act, 2013 from time to time.

Yours faithfully,

(Parul Mathur)
Assistant General Manager & Secretary
Central Complaints Committee
RBI, Central Office
Mumbai

मानव संसाधन प्रबंध विभाग, केन्द्रीय कार्यालय, 21वी मंजिल, केन्द्रीय कार्यालय भवन, शहीद भगतसिंह मार्ग, मुंबई - 400 001. भारत
फोन: 022-2260 1000, फैक्स : 022-2267 1415 ई मेल: cgminchrmd@rbi.org.in
Human Resource Management Department, Central Office, 21st floor, C.O. Building, Shahid Bhagat Singh Marg, Mumbai-400 001. India Tel.: 022-2260 1000 Fax:022-2267 1415 E-mail: cgminchrmd@rbi.org.in

हिंदी आसान है, इसका प्रयोग बढ़ाइए।

भरोसा सेल,वसई विरार

(मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय)

कार्यालयाचा पत्ता- पोलीस उप आयुक्त परिमंडळ-२ कार्यालय वसई वसई रेल्वे स्टेशन जवळ,वर्तक कॉलेज समोर,वसई प.ता.वसई जि. पालघर ४०१२०२

E-mail - bhrosacell.vasai@mahapolice.gov.in

Gmail - bharosacellvasai@gmail.com

मो.नं-८०८००९२१६९

जा.क्र-९२४/२०२३ | दि.१५/१२/२०२३

प्रति

मा. व्यवस्थापक सख्य

महीला मार्गदर्शन केंद्र

निर्मळ, वसई, ता. वसई, जि. पालघर

## शिफारस पत्र

प्रमाणपत्र देत आहोत की, निर्मला इन्स्टिट्युट-सख्य महिला मार्गदर्शन केंद्र मागील ३७ वर्षांपासून लिंगभेदावर आधारीत महिलांवर होणारी हिंसा ह्या संदर्भात कार्य करीत असून स्त्री-पुरुष समानता व समान न्याय प्रस्तापित करणे हा त्यांच्या कार्याचा मुख्य उद्देश आहे. मागील तीन वर्षांपासुन (सन २०२१) सख्य संस्था भरोसा सेल, वसई येथे घरगुती हिंसाचाराने पिडीत महिलांना समुपदेशन व कायदेविषयक सल्ला देऊन महिला सक्षमीकरणाच्या कार्यात सक्रीय सहभाग घेत आहे. त्यांच्या पुढील कार्यास आम्ही सुयश इच्छितो.

आपला

प्रभारी अधिकारी

भरोसा सेल, वसई

मि. भा. व. वि. पोलीस आयुक्तालय

# Women's Participation in the electoral Processes

**By Prof. Vibhuti Patel**



### Introduction

With passing of the Nari Shakti Vandan Adhiniyam (NSVA) 2023 (128th Constitutional Amendment Bill) on women's reservation in Parliament, the Indian women have entered in an era of stronger representation and agenda setting power at a national level. On 22-9-2023, the bill became an Act of the parliament of India. The NSVA ensures 33% reservation of seats in the Lok Sabha and State Legislative Assemblies for women.

### From Toehold to Foothold: Indian Women's Journey of Political Representation

Currently, There are 82 women Member of Parliaments in LS (15.2%) and 31 women in RS(13%). While the number has increased significantly since the 1st Lok Sabha (5%) but is still far lower than in many countries. Women candidates find it very difficult to win the legislative Assembly and Parliamentary elections due to onslaught of money power, muscle power and misogyny. It can be countered only by affirmative action of women's quota. According to Sweden-based International Institute for Democracy and Electoral Assistance (IDEA), besides 40 countries, the countries which have mandated quota for women, major political parties in more than 50 countries have voluntarily set out quota provisions in their own statutes. According to recent UN Women data, Rwanda in Africa (61%), Cuba (53%) and Nicaragua (52%) in Latin America are the top three countries in women representation in the parliament. Bangladesh (21%) and Pakistan (20%) as well are ahead of India in case of representation of women in the National Assembly. According to the report of the Election Commission of India (ECI), women represent 10.5% of all Members of Parliament as of October 2021 and for all the state assemblies, women MLAs' representation stands at an average of 9%.

### Contribution of Women in Political Decision Making and Governance

Women's Leadership in political governance prioritises human development action agenda, with quota of 33% seats in the parliament and legislative assembly, women's weight in the decision making will be critical minimum. Experiences of elected women representatives in the rural and urban local self-government bodies since 1994 have revealed that given the opportunity for collective efforts, they have nurtured their constituencies with efficiency and honesty of purpose. Their record for executing pulse polio campaign, provisioning of water- electricity- road construction, school, health centre, minor irrigation have been recognised in a national level study by NIRD-UNDP study quoted in Human Development Report (2002).

To translate constitutional guarantee of equality into substantive equality, the nation needs to ensure equality of opportunity, equality of treatment, equality of space in public life for nation building, and, women's quota as an affirmative action is a measure in this direction. It is also a win-win formula for the community, region and the nation.

### Agenda for Action for Women Decision Makers

Nurturing women's leadership to

compensate for a historical neglect and channelising talented and motivated women's ability for community development and human development efforts with focus on education, skill building, health and combating gender based violence is the urgent need for gender inclusive nation building efforts. Elected women with mandated power as a result of 1/3 quota, will also bring transformative change in the cultural milieu in the public life. It will encourage more participation of women not only in politics but also in the economic, educational, diplomatic, trade and commerce, governance and criminal justice system. On the whole, 33% women in the upper echelons of political structures will result in more humane policies for children, elderly, persons with disabilities and official recognition of unpaid and paid care work performed for the care of children, elderly and sick members of the family and society. Researches by UNDP and NIRD have shown that, women elected representatives have been judicious in implementing Gender Responsive Budgeting that is directed at reduction of gender gap in health, education, skill, employment, and at promotion of women's decision making power through capacity building. Women's Leadership also results in instituting structures and systems to reduce gender based violence (UNDP Gender Equality Strategy, https://genderequalitystrategy.undp.org/#2022 Accessed on 11-1-2024).

Given the opportunity, as a collective, women decision makers have promoted policy of transformative finances for gender equality. e.g. Campaign started by elected women in Gram Panchayats "Alcohol free villages in Maharashtra"; forcing political leaders to stop diversion of wheat for production of beer in Punjab and distribution of the same wheat through PDS among the poverty groups; using Panchayat funds for installation of *gobar* gas plant, *kanya shala*, piped water in the homes, toilet blocks for women in the rural and urban community, building of schools-shelter homes, hostels and health centres for the community.

Experiences of Rwanda (65% parliamentarians are women), European Parliament (40% parliamentarians are women) have proved that 'critical minimum' representation of women in the public institutions brings professionalism, use of decent language, improved time management and check on corrupt practices and criminal activities.

**Conclusion**

Women political workers of all political parties have a mind of their own, but the political bosses, while allocating seats to contest elections, do not promote veteran women political activists of their own party. Most of the political parties have used their women workers only as foot soldiers. All political bosses have succumbed to money and muscle power. Women's reservation in the parliament and legislative Assembly and legislative Councils of the state governments as an affirmative action for the historical injustices faced by women is the only way to ensure level playing field for women in the electoral politics which is dominated by money-mafia-misogyny and muscle power.

Keeping all these factors into consideration, the women's rights movement arrives at a conclusion that while there is a rider in the NSVA regarding the implementation time-frame, it's essential to recognize that this is a significant step forward. Now, as we look ahead, political parties have no more excuses. The 2024 elections provide a golden opportunity to take decisive action and allocate the seats to contest election to aspiring women candidates as needed.

Let's continue this journey with hope and determination, knowing that our collective efforts have brought us closer to a more inclusive and equitable political landscape and due share in representative democracy. The gender justice proposed by the *Nari Shakti Vandan Adhiniyam* in the legislative domain will provide impetus to balanced policy formulation

# या दशकातील स्त्री आव्हाने आणि संधी

- प्रकाश आल्मेडा
मो.: ८६००१७८८२५



स्त्रीयांसाठी फार आव्हानात्मक काळ आला आहे. आजच्या काळाचं वर्णन करायचं झालं तर शोषणाचा, फसवणूकीचा आणि विषमतेचा तरिही मुक्तीचा, विविध संधींचा म्हणून गोंधळात टाकणारा काळ असं करता येईल. स्त्रीयांसमोर विकासाची संधींची, संधींच्या विषमतेची, मुक्तीची जी काही बहुपदरी आव्हाने आहेत ती केवळ निरक्षर अशिक्षितच नव्हे तर उच्चशिक्षीत स्त्रियांसमोरही आहेत. सगळं कसं वेगाने बदलतंय. तंत्रज्ञानात होणारे बदल आपल्याला सैरभैर करताहेत. चॅट जिपीटी (जनरेटिव्ह एआय) हे कुत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित तंत्रज्ञान किमान साठ टक्के नोकऱ्या घालविणार आहे, अशी भिती आहे आणि मोठमोठया कंपन्यांनी जगभरात कामगार कपात करायला सुरूवात केली आहे. उच्चशिक्षित, अनुभवी माणूसही बेरोजगार होत आहे. निर्दयपणे कामगार कपात होत आहे. वापरून फेकून दिल्या जाणाऱ्या टिश्यू पेपरसारखी आपली अवस्था होत आहे असे अनेकांना वाटते. माणसांची जणू गरजच नाही. नवनव्या नोकऱ्या, नवी क्षेत्रे निर्माण होत आहेत हे जरी खरे असले तरीही त्यात निभाव लागेल तो उच्चशिक्षीत, स्पेशलायझेशन केलेल्यांचाच. ज्ञानही आता कालबह्य होत आहे, त्यामुळे सतत शिकत राहावे लागणार आहे. कालच्या ज्ञानाच्या आधारे आज काम करता येणार नाही आणि उद्या टिकता येणार नाही. भविष्यवेत्ता ऑल्विन टॉफलर म्हणतो की, एकविसाव्या शतकात हुशार कोण तर तोच जो शिकेल, शिकलेले मागे टाकेल आणि नव्याने शिकेल. आता सगळेच आयुष्यभर सतत शिकणारे असणार आहोत. जागतिकीकरणाच्या रेटयात सगळयाच नव्याने आणि सतत शिकता येईल काय? नवनवी कौशल्ये शिकण्यासाठी लागणारी संधी, पैसा आणि वेळ सगळयांनाच मिळेल का? सध्याची विषमता पाहता परिस्थिती चिंताजनकच आहे.

हे सगळे अशासाठी गांभीर्याने विचारात घ्यायचे कारण आपाण जागतिकीकरण, पर्यावरणाचे संकट आणि त्याचे होणारे बरेवाईट आघाती परिणाम या ठळक बाबींचा विचार करीत असताांना झपाटयाने बदलत्या कुत्रिम बुद्धिमत्तेसारख्या तंत्रज्ञानाचा स्त्रियांवर होणारे परिणाम, त्यांच्या आर्थिक, सामाजीक, राजकीय स्थितीवर होऊ घातलेल्या परिणामांचा विचार करायला हवा. सध्या जगभर आणि आपल्या देशातही अब्जाधिशांची संख्या वाढत असताना वाढत्या अक्राळविक्राळ विषमतेचा खास करून स्त्रीयांवर, त्यांच्या जीवनसंघर्षावर होणाऱ्या परिणामांचा विचार व्हायला हवा. 'कुत्रिम बुद्धिमत्ता आणि भारतीय स्त्री दशा आणि दिशा' असा विचार करीत असताना केवळ नवनव्या तंत्रज्ञानाचा लाभ घ्यायला सज्ज व्हा असे केवळ ओरडण्यात अर्थ नाही. ग्रामीण आणि शहरी स्त्रियांचे जीवन फार वेगळे आहे. शहरी गरीब असा एक मोठा वर्ग आहे, त्यातील शहरी गरीब स्त्रीया हा मोठा वर्ग आहे. ग्रामीण भागात स्त्रीयांचे होणारे शोषण आणि शहरी भागातील स्त्रीयांचे होणारे शोषण वेगवेगळया स्वरूपाचे आहे. उच्चशिक्षित आर्थिकदृष्टया स्वतंत्र झालेल्या स्त्रियांनाही खूप काही सोसावे लागते. त्यात नव्या तंत्राज्ञानामुळे, बदलत्या अर्थव्यवस्थेमुळे त्यांचे जीवन ढवळून निघत आहे. उदाहरण द्यायचे तर कॉम्पयुटरच्या क्षेत्रातील उच्चशिक्षित स्त्रीयांना सातत्याने येणारे नवनवे तंत्रज्ञान शिकण्यासाठी आटापीटा तर करावाच लागतो पण त्याच बरोबर कामकाजासाठी खूप तास काम करणे, घरी उशिरा येणे, जेथे कंपनी पाठवील तेथे जावे लागणे, अशा अनेक बदलांना तोंड द्यावे लागते. घरापासून दूर जावे लागल्याने सगळी गणिते बदलतात. अनेक होतकरू, बुद्धिमान तज्ज्ञ स्त्रीयांना कौटुंबिक बाबींमुळे तडजोडी कराव्या लागतात. अनेकांना तर मेहनतीने उभारलेले करीअरचे क्षेत्र सोडून दुसऱ्याच क्षेत्रात जावे लागते. उदा. मुंबईत आता सेवाक्षेत्र वाढते आहे ज्यात ज्ञान व कौशल्यांना महत्त्व आहे. ज्ञानाची विषमता हे मोठे आव्हान आहे. ज्ञानाच्या भाषेचे आव्हान आहे. इंग्रजी ही भाकरीची भाषा आहे. ग्रामीण

अर्थव्यवस्थेची पडझड होत असताना शहरी भागांकडे स्वप्नांची गाठोडी घेऊन येणाऱ्या तरूणांना इंग्रजीच्या अभावाने खूप संधी गमावाव्या लागतात. ज्ञानाची विषमता आर्थिक विषमतेहून अधिक मारक ठरते. सध्या ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेविषयी खूप बोलले जात असताना ''ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेत ज्ञानकर्मी (नॉलेज वर्कर) म्हणून भारतीय स्त्रीचे स्थान' हा चिंतनाचा व चिंतेचा विषय आहे. उमेदीची वर्षे खर्ची घालून कष्टाने व नेटाने घेतलेल्या शिक्षणातून आर्थिक लाभ होणार नसेल तर ते मोठेच संकट आहे. आज तलाठयाच्या एका पदासाठी हजारो एमबीए, इंजिनिअर सारखे उच्चशिक्षित झगडतात, ते पाहून धडकी भरते. तरूणांचा हा देश अपार अस्वस्थ आहे. डिमोग्रॅफिक डिव्हीडंट डिमोग्रॅफिक डिझास्टर व्हायची भीती आहे. शिक्षण फसवे ठरत आहे, कालबाह्य, निरुपयोगी ठरत आहे.. त्यावरील गुंतवणीकीतून परतावा म्हणून हाताशी काही लागत नाही. आणि अगदी उच्चशिक्षीतांनाही जगण्यासाठी मिळेल तो आणि पडेल ते झोमेटोची पार्सल नेण्याचे काम करण्याची वेळ आली आहे. या झाकोळाचा स्त्रीयांवर मोठा पारिणाम होत आहे. स्त्रीयांच्या म्हणून काही निश्चित समस्या निर्माण होत आहेत.

सरकार तर अर्थव्यवस्थाच नव्हे तर शिक्षणातून खाजगीकरणाच्या मार्गाने बाहेर पाडत आहे. खाजगी भांडवलाचे स्वार्थी निर्णय वरचढ ठरत आहेत. नफा हाच या खाजगी भांडवलावरील व्यवस्थेचे सूत्र आहे. आरक्षणासाठी अनेकांचे संघर्ष सुरू असले तरीही खाजागीकरणाने नोकऱ्यांचाच शेवट होत आहे आणि हे लक्षातही येत नाही. सरकारी नोकऱ्यात भरतीची केवळ पोकळ आश्वासने आहेत. आज शहरी भागात स्त्रीयांना रोजगारासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे वास्तव भिषण आहे. असहायतेच्या भावनेने अनेकजण नैराश्यग्रस्त आहेत, आपल्यासाठी काही सधींच नाही ही भयकारी जाणीव तरूणाईला अस्वस्थ करीत आहे. वेगाने होणारे ऑटोमेशन, रोजगाराची बदलती स्थिती आणि स्त्रीया हा विषय महत्त्वाचा आहे. शिक्षणातून सगळया समस्या सुटू शकतात हा भाबडेपणा आहे. खरेतर शिक्षणाने वेगवेगळया समस्या निर्माण होत आहेत. तंत्रज्ञानाचा विकास थांबविणे अशक्यप्राय आहे, आपल्यालाच बदलांशी उशीर न करताा जुळवून घ्यावे लागणार आहे. ''बळी तो कान पिळी, बलवान तो टिकेल'' असा जमाना आता नाही. जो परिस्थितीनुसार बदलून जुळवून घेईल तोच टिकेल, हे वास्तव आहे. महाकाय शक्तिशाली डायनॉसोर बदलांशी जुळवून घेऊ शकले नाहीत म्हणून नष्ट झाले. बदल समजून घेतल्याखेरीज त्याचा लाभ घेता येणार नाही. पण सगळे लक्षात आले आणि संधींच नसली, संसाधनेच नसली तर काय करायचे? शिक्षण घेतले तरीही नोकऱ्याही निर्माण व्हायला हव्यात. त्यासाठी गुंतवणूक हवी.

आता केवळ मेहनती, हुशार, गुणवत्ता वगैरे असून भागत नाही. उच्चशिशण घ्यायला, सतत शिकायला पैसा लागतो. चॅट जिपीटी आपल्याला मागे टाकणार नाही तर ज्यांनी चॅट जिपीटीवर प्रभुत्त्व मिळविले आहे ते आपल्याला मागे टाकतील म्हणून हे नवे तंत्रज्ञान शिकून घ्या वगैरे म्हणणे तसे सोपे आहे व ते खरेही आहे, पण शिकायचे कसे? अडचणींचा विचार व्हायला हवा. बदलत्या तंत्रज्ञानामुळे स्त्रीयांवर होणाऱ्या परिणामांचा समग्र अभ्यास व्हायला हवा. मुली खूप महत्त्वाकांक्षी होत असल्याचे लक्षात येते. त्यासाठी लागेल ती मेहनत आणि करीअरसाठी लग्न वगैरे मागे टाकण्याचीही, कोठेही शिक्षण व नोकरीसाठी जाण्याची त्यांची तयारी असते. आज आयएएस सारख्या सनदी सेवांमध्ये स्त्रीयांचे प्रमाण मुलांपोक्षा वाढू लागले आहे. अगदी स्टार्टअप्सद्वारे स्वत:चा व्यवसाय उभारू पाहाणाऱ्या स्त्रीयांच्या यशोगाथा वाढत आहे. स्त्रीयांची एक प्रचंड ऊर्जा सगळीकडे दिसून येत आहे आणि विकासाला मोठे बळ देत आहे. मात्र यात सगळयाच स्त्रीयांना स्थान नाही. मुळात शिक्षणातही एक ''उच्चभ्रू महागडे शिक्षण आणि मागास म्हणावे असे गरिबांसाठीच्या शाळांतील शिक्षण'' अशी जातवारी कास्टसिस्टम दिसून येत आहे. श्रीमंताानी आता त्यांच्यासाठी आज यीसीएसई वा आयबी अशा बोर्डसची सोय करून परदेशी जाण्याचे राजमार्ग तयार केले आहेत. त्यात बहुजनांच्या शिक्षणात उपलब्धता, दर्जा आणि संधींची समानता हे विषय तीव्र होत असतानाच केवळ आठवी दहावीच नव्हे तर बारावी पर्यंत शिकलेल्यांनाही साधे गुणाकार भागाकाराचे गणित येत नसल्याचे दुर्दशाजनक चित्र असर सारख्या संस्थांच्या अभ्यास पहाणींतून समोर येते. पदवीच्या

कागदासाठी पैसे व वर्षे द्यायची पण ज्ञान व कौशल्यांचा पत्ताच नाही. शाळा आहे पण शिक्षण नाही, पदवी आहे पण ज्ञान कौशल्ये नाहीत अशी आफत आहे.

झपाटयाने बदलणाऱ्या, वाढत्या विषमतेने ग्रस्त जगात तरूणाईला जगण्याचा संघर्ष करावा लागतो. पुण्यात स्पर्धा परीक्षांच्या मृगजळामागे धावणाऱ्या लाखो मुलांमुलींसाठी रोजगाराचा प्लान बी वगैरे तर नाहीच पण पुढे मोठा अंधार आहे. त्यात मुलींची संख्या मोठी आहे. अशा अनेक बहुपदरी आव्हानांना आजच्या मुलींना सामोरे जावे लागत आहे. लग्नाचे वय निघून गेलेय, हातात पुस्तकी ज्ञानाच्या पदवीचा कागद आहे. शहरात आवश्यक ते ज्ञानकौशल्ये नाहीत अशा कात्रीत लाखो मुली सापडल्या आहेत. डीएड व बीएडच्या माध्यमातून मिळणाऱ्या सुरक्षित शिक्षकी नोकऱ्या आता नाहीत, त्यातही शिक्षक पात्रता परीक्षा वगैरेंचे अडथळे आहेत. डीएड बीएड करूनही हाताशी काही नाही अशांची संख्या वसईतही मोठी आहे. अनेक तरूणांमध्ये नकारात्मकता दिसून येते. येथे संघर्ष करण्याऐवजी दुसरीकडे कोठे अगदी विदेशातही जायचा विचार होत आहे. आज राज्यात किमान अठरा वीस लाख डीएड व बीएड बेरोजगार आहेत. यात अर्थातच स्त्रियांचे प्रमाण मोठे आहे. त्यातही शिक्षक पात्राता परीक्षा, नेटसेट वगैरे असूनही भरतीच होत नसल्याने नैराश्यग्रस्त झालेल्यांची व खाजगी शाळांमध्ये विविध प्रकारच्या पिळवणूकीत पिचता असलेल्यांची संख्या मोठी आहे. यात स्त्रीयांचे प्रमाण मोठे आहे. नोकरी मिळविण्यासाठी ही अडकून पडलेली स्त्री कायकाय करतेय, हे पाहिले की सरकारी नोकऱ्यासाठी विविध स्पर्धा परीक्षांची असहायपणे आज ना उद्या काहीतरी घडेल या वेडया आशेने तयारी करताना दिसते.

जर आपण विश्वगुरू होऊ पाहणाऱ्या भारतात ''येत्या दशकातील स्त्री समस्या, आव्हाने व संधी'' असा विषय घेतला तर समस्यांचे अनेक पदर समोर येतात. पर्यावरणाच्या समस्यांचा स्त्रीयांवर होणारा आघाती परिणाम पुरूषांवर होणाऱ्या परिणामांहून मोठा आहे. हवामान बदल आणि येत्या दशकातील स्त्रीजीवन असाही विषय आहे. येते वर्ष सरत्या वर्षापेक्षा अधिक उष्ण ठरत आहे. तापमानवाढीमुळे मोठया समस्या निर्माण होणार आहेत. सशोधन अहवाल भिषण चित्र मांडत आहेत. उदाहरणार्थ, या दशकाच्या शेवटापर्यंत उष्णता एवढी वाढेल की कोलकाता व मुंबईसारख्या शहरात किमान तापमान तब्बल ४० डिग्रीहून अधिक असेल. लाखो लोकांना अगदी घराबाहेरही पडून कामकाज करणे मोठे अवघड, धोक्याचे होईल असे इशारे आहेत. पत्र्याच्या झोपडपट्ट्यांतील जगण्याचा विचारही शहारे आणणारा आहे. विषमता आता जन्मापासून नव्हे तर जन्मण्याआधीपासूनच सुरू होते. पर्यावरण बदलांचा स्त्रीयांवर होणारा परीणाम चिंताजनक आहे.

''या दशकातील स्त्री'' असा विचार करीता असताना २०३० पर्यंत अनेक पिढया येतील. या दशकाच्या म्हणून काही समस्या आहेत. आधीच्या दशकातील समस्या या दशकाच्या शेवटी उग्र होतील, बहुपदरी होतील. नव्या समस्या निर्माण होतील. काल केले तेच आज केले तर वेगळे काही हाती लागणार नाही. वेगळे, वेगळया पद्धतीने करावे लागेल. सगळया बदलांच्या मुळाशी आता अर्थव्यवस्थेतील बदल असतात. माणूस आता सामाजिक प्राणी वगैरे असण्याआधी आर्थिक प्राणी आहे असे म्हणावे लागते. सगळे अर्थकारणाने चालते, झुलते, वळते आणि बदलते.

सध्याच्या नवसर्जनशील अर्थव्यवस्थेत स्त्रीयांसमोरील असलेली आव्हाने समजून घायला हवीत. त्यांच्या सद्यस्थितीचे खरे चित्र समजण्यासाठी खरी माहिती हवी. पिरॅमिडच्या तळाशी मोठया संख्येने स्त्रीया जगण्याचा झगडा करीत अडकून पडल्या आहेत, वर येण्याची शिडीही नाही. पोटभरु जगण्याच्या संघर्षासाठीच सगळी उर्जा खर्च होत आहे. त्यात संघटीत होण्याऐवजी तुटलेपणा व संघटीत स्वरूपाचे असहायपण दाटू लागले आहे. याच वेळी उमेद वाढविणाऱ्या नवनव्या यशोगाथाही घडत आहेत. जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्रिया धडका देत स्वत:चे स्थान व अस्तित्त्व निर्माण करीत आहेत. स्त्रियांची म्हणून एक अर्थव्यवस्था निर्माण होता आहे जणू. नवउद्यमी स्टार्टअप्समध्ये मुलींची संख्या मोठी आहे. अगदी गावाकडच्या मुलींमध्ये केवळ शहरात येण्याचीच नव्हे तर विदेशात शिकण्याची जिद्द असल्याचे दिसून येते. आज शंभर एकर जमीन असलेल्या शेतकऱ्याच्या मुलाला लग्नासाठी मुलगी मिळत नाही मात्र

शहराकडे प्यून असलेल्याला उत्तम स्थळे येत असल्याचे चित्र असल्याचे वाचायला मिळते. नव्या पिढीतील ‘‘जेन झी’’ मधल्या मुली वेगळया आहेत. आपाल्या वसईतून मोठया संख्येने मुली उच्चशिक्षण व करीअरसाठी विदेशात जात आहेत. लेखक करीअर समुपदेशक असल्याने मुलींच्या भावविश्वातील हे बदल नेहमी अनुभवायला येत आहेत. मुलींची मनोवस्था अनेक टोकांमध्ये हिंदोळत आहे. त्यांच्या जीवनाविषयी कल्पना वेगळया व धाडसी आहेत. काही हताश आहेत, काही डगमगत्या आत्मविश्वासाने झगडत आहेत तर काही ठामपणे लढवय्या वृत्तीने जे पुढे होईल तो बघून घेऊ अशा विचाराने जगाला, जगण्याला भिडायला सज्ज होत आहेत. एकाच वेळी वेगवेगळे चित्र दिसून येते. मात्र स्त्री आता वेगळा विचार करू लागल्याचे स्पष्ट जाणवते. मात्र बदलांना तोंड देण्यासाठी पारंपारिकच नव्हे तर हिंमतबाज, आव्हानात्मक, कठीण वाटेने (सोपी वाट आता आहेच कोठे? होतीच कधी?) जाऊनच विकासाची शिडी चढता येईल. सगळेच स्पर्धात्मक असणार आहे, ताटात वाढून काहीच मिळणार नाही. वेगळया वाटा शोधाव्या लागतील, अगदी निर्माणही कराव्या लागतील, त्यासाठी स्वत:विषयीचा आत्मविश्वास योग्य शिक्षणाने, ज्ञानकौशल्यांनी बळकट करावा लागेल. त्यासाठी समुपदेशकांची भूमिका मोठी राहील. उदा. करीअरचे क्षेत्र निवडण्यासाठी मुलींना योग्य वेळी, योग्य मार्गदर्शन मिळायला हवे. मुळाताच कमी असलेली संसाधने सर्वोत्तम कामी वापरली जायला हवी. करीअरच्या क्षेत्राची चुकीची निवड सगळीच दिशा व दशा बिघडवून, नासवून टाकते.

२०३० संपेल तेव्हा स्त्रियांचे जीवन व जगण्याचा संघर्ष खूप बदललेला असेल. अनेकजणी विविध संधी टिपून विविध क्षेत्रात पुढे गेलेल्या असतील तर काही थेट कुंटणखान्याच्या गर्तेतही पिचत पडलेल्या असतील. ‘‘सख्य’’ सारख्या संस्थांचे योगदान फार महत्त्वाचे आहे. पखांना बळ देणारे आहे. येत्या दशकातील स्त्रियांचा विचार करीत असताना नेमके काय बदल केले पाहिजेत, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून सक्षमतेसाठी नवनव्या संधी कशा निर्माण करता येतील, स्पर्धेसाठी समतल क्षेत्रे (लेव्हल प्लेयींग फिल्ड) कशी निर्माण करता येतील, कायदा व शासनव्यवस्था यात काय बदल करावे लागतील, समाजाच्या बदलत्या मानसिकतेची सकारात्मक जडणघडण कशी करता येईल अशा विविध बाबींचा वेध घ्यावा लागेल. त्यासाठी व्हिजनरी नियोजन करावे लागेल. स्वत:साठी भविष्य निर्माण करावे लागेल. आव्हाने असणारच आहेत, स्त्रीयांसाठी आव्हाने नव्हती कधी, रात्र वैऱ्याची नव्हती कधी? मानवी इतिहास हा स्त्रियांच्या जीवनसंघर्षाचा इतिहास आहे. मात्र स्त्रिया नव्याने समाजाची फेरमांडणी करून, नव्या व्यवस्था निर्माण करून नव्या उमेदीने नवे दशकच नव्हे तर नवे भविष्य घडवू शकतील असा विश्वास ठेवता येईल.

‘‘हीच अमुचि प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे, माणसाने माणसाशी माणसासम वागणे’’ या गीतातील माणसाने माणसाशी माणसासम वागण्याचे आव्हान चिरकाल आहे, हा लढा स्त्रीयांसाठी कायम राहणार आहे. आता समाज बदलेल की नाही याची वाट न पाहता आणि पर्वाही न करता स्वत:चे स्वतंत्र भवितव्य घडविण्यासाठी आणि ते घडते भविष्य बिघडवू पाहणाऱ्यांना बाजूला सारत स्त्रीयांनी पुढे जायला हवे. या दशकाच्या मुशीतून घडणाऱ्या आणि पुढच्या दशकात दमदारपणे प्रवेश करणाऱ्या स्त्रीचे मोठया उत्सुकतेने व प्रेमादाराने स्वागत करू या.




## Well Wishers

1. Ms. Natal Mashal Mascarn
2. Ms. Barsal R. D'souza
3. Mr. Paul Rosario
4. Ms. Neeta Luis D'souza
5. Frank Chashmewale

# Count Her in: Accelerating Gender Equality

**Dr. Prabha Tirmare**
Associate Professor (Retd), CSWNN, Mumbai) at present Education and NGO Consultant, International Visiting faculty and engaged in handholding Rural-Urban Youth



**Introduction**

While examining acceleration of gender equality, '*To Count Her in'* the prerequisites are countless. It starts with the well-known saying 'Womb to Tomb' that depicts her journey of struggle to live as a human with dignity. "Womb to Tomb" precisely means that she is at risk throughout her life. In the entire socialization process, the girl or the woman is considered as 'second sex or second gender'. Then the big question arises, 'what is meant by accelerating gender equality'? This follows with the question about where women stand or whether she is counted as a 'person'? Women are used-misused-abused as and when as per the convenience of patriarchy. This phenomenon relates to all aspects such as the gender proportion, gender preferences, education status, health issues, menstruation hygiene, reproductive health, career opportunities, freedom to decide marriage or post marriage life, financial stability, property rights, domestic violence, sexual abuse, objectification in media & so on.

**Indian Constitution' to liberate her**?

Interestingly, the topic of the article, *'Count Her in: Accelerating Gender Equality'* develops the sense of debate to argue whether women are gravitating towards progress to achieve gender equality or if they are suppressed by the systems and structures. The shift from 'Manusmuti', the traditional script, to the 'Indian Constitution' which is the modern document, projects the time line to assess acceleration of gender equality. Had Manusmriti not been challenged by the Indian Constitution, the topic of debate would have been irrelevant. Because then, the traditional barbaric practices such as Sati-Pratha, Child Marriage, Widowhood, Dowry, Prostitution, Devdasi system etc would have been practiced blindly as religious rituals without thinking of such hegemony and injustice on women. The concern is that today also the women across all strata/sector are very often beaten up by addicted husbands at home and outside at work place, they are the victims of sex abuse despite of the legal provisions such as domestic violence act (2005), POSH act (2013). Let us reflect on the root cause of womens suffering.

**Educate-Earn-Equality:**

The historical regulations by Manu-Smruti which sanctioned subjugation of girl/woman by her own father-husband-son has been reformed by the Indian constitution which values her as a 'person'. The Indian Constitution bestows on women all human rights. That's how the doors of education opened to her to educate, earn & live better life. Because of this shift, progressively observed that women have come into the limelight and are being represented in all fields. They are sportsperson, defense personnel, scientists, pilots, ministers, doctors, engineers and so on. Again, the question is, what is their proportionate number in the respective fields, and the extent of the double burden of family care which they deal with. On the other hand a large population of women are engaged as domestic workers, mine workers, construction workers, land less labourers & in other un-organized sector. They are at risk and face livelihood challenges. Do we know whether, how much and what do they get as compensation for their un-dignified labour? The fact is that they do not get sufficient income, legal protection, job or social security benefits.

With regards to the present status of women, they are victims of patriarchy and continue to

occupy second place in comparison to men, ignoring themselves in the process. Hence, besides the proportion & type of engagement of women in various sectors' her structural role in significant systems like socio-religious, economic and political need to be understood critically.

**Socio-religious, economic and geo-political spaces:**

We do not need research data for such study because these are routine practices experienced universally irrespective of caste, class, region or religion. In the religious system, she is not or cannot be the head, as the norms of any religion do not allow it on the contrary, she has to follow the harmful religious rituals without any rationality. The political system which is the most powerful system in decision making, currently only 15% Loksabha MP's and only 13% of Rajya Sabha MP's in India are women. These numbers show poor proportion of women to make any policy decisions. Economically, since men are the heads of families, they enjoy property rights and possess ownership of house, land and other wealth of family. These socio-economic-religious and geo-political systems control women or rather prevent her from exploring her talent to make an egalitarian society. Her complete potential and wisdom remains unused, both for self-growth and for the wellbeing of the larger society. In such scenario how do we say that gender equality is accelerated?

**To 'count her in for acceleration of gender equality' our collective agenda can be understood and needs to be implemented at individual, family, community and NGO levels as follows;**

**Socialization Process:** Families should train boys and girls from their childhood to take all house hold & social responsibilities, respecting each other to become responsible citizens. Before marriage young boys and girls should be independent to take care of their own livelihood instead it being dependent on parental families.

**Economic Independence:** Women should also be considered head of the family by acknowledging her contributions and offering her all the property rights.

**Religious Responsibilities:** Women should be considered significant stakeholders of the society by providing them religious knowledge to preach & perform the rituals to become the head of the system.

**Political Rights:** Efforts should be made to make women aware about their political rights to participate in decision making by ensuring appropriate proportion of women in politics at all levels.

**Conclusion:**

It is noteworthy that women are learning to raise their voices for their rights. They are moving forward & exploring paths for progress. However, prerequisites to say that gender equality is accelerating are that (i) the birth of girl child should be welcomed, instead of calling her 'Nakoshi,' means rejected, (ii) representation of men and women should be equal in number in all spheres to avoid gender gap, (iii) abusive practices such as domestic violence, child marriage, dowry death, sexual abuse, rape, prostitution, acid throw, eve teasing should disappear for safe living of women as human being, (iv) women should be completely free from patriarchal domination. Only after attainment of these prerequisites it can be proudly declared that gender equality has accelerated.

Best tool to bring social change to accelerate gender equality is, 'preamble' of our constitution. All citizens inclusive of children, youth, men women, shall pray and practice the values of justice, equality, fraternity, secularism for solidarity to make men-women equal & respect each other to live as happy partners.

So knowing these facts of structural injustice on women it is the responsibility of all stakeholders to direct our thought processes towards a better action for zero injustice. To declare the phrase 'acceleration of gender equality', collective action with value based thought processes should be the call of the day.

# आई असते जन्माची शिदोरी...

**- प्रो. शैला गोन्सालविस**

**आई असते जन्माची शिदोरी,**
**सरतही नाही, उरतही नाही**

असे कवी फ. मु. शिंदे म्हणतात. बरोबर आहे; आई असलेली स्त्री जिच्या अस्तित्वाने जगाचीच वंशवृद्धी होते, जग टिकून आहे. जी संसाररूपी इमारतीचा खांब आहे, ज्या खांबावर कुटुंबाचीच नव्हे तर अख्ख्या विश्वाच्या 'इमारतीचं' छप्पर बसलेलं आहे. अशा या 'स्त्री' च्या संदर्भात आपण विचार करतो. तेव्हा आपल्याला काय दिसते? दिल्लीमध्ये सायंकाळी बसमध्ये मित्रांसमवेत प्रवास करणाऱ्या २३ वर्षीय तरूणीवर सामुहिक बलात्कार करून निर्घृण हत्या केली जाते. उल्हासनगरमधील शालेय विद्यार्थीनी रिंकू पाटीलला जिवंत जाळले जाते. मुंबई मधील विद्या प्रभूदेसाईवर भर चौकात रहदारीच्या वेळेत ॲसिड टाकून जाळले जाते. सांगली येथे मार्केट याडमध्ये चाकूच्या वाराने अमृता देशपांडेचा बळी घेतला जातो. वर्धा येथील तरूण प्राध्यापिकेला जिवंत जाळण्यात येते. वसई मधील श्रद्धा वालकरचे तुकडे केले जातात. पुरूषी अहंकाराच्या बळी ठरलेल्या या प्रतिनिधिक स्त्रिया. अशा असंख्य घटना आपल्या अवती-भोवती घडतात. आपण उघड्या डोळ्यांनी या घटनांना सामोरे जातो. प्रसारमाध्यमे 'नग्न' स्त्रियांची चित्रे दाखवतात. नग्न फोटो व्हायरल होतात. स्त्रियांची विटंबना केली जाते, अब्रू लुटली जाते. तीन-चार वर्षे वयाच्या कोवळ्या मुली की ज्यांचे ओठ पिळले की दुध निघेल अशाही मुलींची सर्रासपणे अब्रू लुटली जाते. तेव्हा मन आक्रोशते... चवताळून उठते. ही अमानवी कृती समाजात आजही कशी ? आणि का घडते? या स्त्रीला का म्हणून अत्याचाराच्या पाशवी गुहेत का ढकलले जाते?'स्त्री ही उपभोग्य वस्तू आहे' ही समाज पुरुषांची असलेली मानसिकता मुळापासून उखडून टाकणे ही काळाची गरजच आहे.

प्राचीन काळी 'स्त्री' शिक्षणात अग्रेसर होती, गार्गी, मैत्रेयी सारख्या स्त्रिया वाद-विवादात भाग घेऊन निर्भयपणे आपले म्हणणे मांडीत असत. मध्ययुगीन काळात शिक्षण गंगेला ओहोटी लागली. पालक वर्गांनी 'स्त्री'ला 'चुल-मूल' पुरता मर्यादित ठेवले. तेव्हाच तिच्या सामाजिक अध:पतनाची सुरूवात झाली. तिच्यावर समाज-पुरूष अधिकार गाजवू लागला. भारतीय समाजाचा विचार करताना म्हणता येईल की तेव्हाच लिंग असामनतेचे स्फुल्लिंग पेटतो. शिक्षणाचे शस्त्र हाताशी घेऊन सावित्रीबाई फुले यांनी ही चौकट मोडण्याचा श्रीगणेशा केला. परंतु तथाकथित पुराणमतवाद्यांना हे पटले नाही, रूचले नाही. एकीकडे स्त्रिया शिकू लागल्या, स्वत:चे अस्तित्त्व सिद्ध करू लागल्या. परंतु दुसरीकडे लिंग असमानतेचा घोडा वेगाने दौडू लागला. मुलीचा गर्भ नकोसा झाला. गर्भपाताचे सत्र सुरू झाले. उमलण्याआधी कळ्या खुडल्या गेल्या. याचा परिणाम काय झाला? समाजात अविवाहीत मुलांची संख्या वाढू लागली. त्याचे दूरगामी परिणाम समाजालाच भोगावे लागले आणि लागताहेत. परिणामी नैराश्याचे वातावरण निर्माण झाले. तेव्हा एक नारा समाजात दिला जाऊ लागला.

लडका-लडकी के भेदभाव को खत्म करो ।
नई शुरुवात के लिए मिलकर कदम रखो ।।

अशीच व्यवस्था आपल्याला निर्माण करायची आहे. ही लिंग असमानता रोखण्यासाठी जे उपाय आहेत त्याकडे लक्ष देणं, अंमलबजावणी करणं हीच आजची खरीखुरी गरज आहे. सर्व प्रथम पालकांनी आपल्या मुला-मुलींना समान वागणूक द्यायलाच पाहिजे.

लडका-लडकी है एक समान ।
दोनो को दो पुरा सम्मान ।।

गर्भपातावर बंदी आणण्यासाठी तळागाळातील लोकांपासून उच्चविद्याविभूषित डॉक्टरांपर्यंत कडक निर्बंध ठेवायलाच पाहिजेत. जीवनाच्या हरेक क्षेत्रात स्त्री-पुरूषांना समान अधिकार मिळायलाच हवा. तसेच समान रोजगारीची संधीसुद्धा मिळायलाच हवी. या चांगल्या कामासाठी आडकाठी घालणाऱ्यांना कठोर शिक्षा द्यायलाच हवी. लिंग समानता जोपासण्यासाठी सरकारकडून ज्या राष्ट्रीय कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू आहे, ते शंभर टक्के यशस्वी व्हायलाच हवा. स्त्रियांसाठी राजकारणात, नोकरीत आरक्षण दिलेच पाहिजे. तरच लिंग समानता जोपासणारा समाज तयार झालाय असे म्हणता येईल. एकदा गणपतराव दर्याजी थोरांतांनी महात्मा ज्योतिबा फुले यांना प्रश्न विचारला. सत्यवर्तनी कोण? तेव्हा ज्योतिबा फुले यांनी ३३ नियम सांगितले त्यामधील एक नियम म्हणजे जो स्त्री-पुरूष समानता मानतो, वागतो, आचारण करून प्रेरक ठरतो तो सत्यवर्तनी होय. या पद्धतीने वागणारे निर्माण होतील तेव्हा

समाजाचे खऱ्या अर्थाने परिवर्तन होईल असे म्हणता येईल. या संदर्भात मला इंग्लंडचे माजी पंतप्रधान विन्स्टन चर्चिलबाबतची एक घटना इथे नमूद करावीशी वाटते. वयाच्या ९०व्या वर्षी त्यांना प्रश्न विचारला की, तुमचं सर्वात मोठं यश कोणतं? उत्तरादाखल ते म्हणाले, 'मी माझ्या बायकोला माझ्याशी लग्न करायला राजी केले' हेच माझ्यासाठी मोठं यश होतं. जेव्हा आपल्या भारतीय समाजात अशी प्रत्येक पुरुष वर्गाची मानसिकता असेल तेव्हाच लिंग असमानतेचा जीवघेणा प्रश्न सुटू शकेल, म्हणून आजपासून प्रत्येकांनी मनोमन एक संकल्प केला पाहिजे की,

मुलगा मुलगी एक समान
दोघे उंचावतील देशाची शान

तेव्हाच दरवर्षी म्हटले जाणारे १५ ऑगस्टचे गीतच सार्थ ठरू शकेल.

जहाँ डाल डाल पर सोने की चिडियाँ करती है बसेरा ।
वो भारत देश है मेरा । वो भारत देश है मेरा ।
जहाँ सत्य, अहिंसा और धरम का पग पग लगता है मेला ।
वो भारत देश है मेरा । वो भारत देश है मेरा ।

# Message

**Sunila Bhise,** Ex-staff Sakhya

Work of Sakhya is a beneficial process of women empowerment among the village and tribal woman in Thane and Palghar district. It is a canter for women where they can come and discuss when they are in trouble. Thank you to all the Parishes, local groups, organizations, School, colleges who encourage to Sakhya to address the women's issue. They have created platform for Sakhya to talk and discuss about the issues. Training program is very effective program of Sakhya. These trainings are more interactive and knowledgeable.

In the present day nature of women's issues are changing. Changes in political scenario, social media has an adverse effect on women's issue which will be complicated and not easy to comprehend. Women's themselves are not aware of root cause of her issues. But being in this profession, organization members should aware of it.

Sakhya staff is committed and dedicated in their work, I feel Sakhya counselor should more aware of mental health issue, because when someone is going through traumatic experiences they are also mentally affected and disturbed. So counselor should able be able to handle mental health part if not then refer such cases to concern related authority. Sakhya counselor should able to diagnosed clients mental state of mind.

# शेतकरी गट, गास ह्यांचा संदेश

'स्त्री' सक्षमीकरणाचे प्रयत्न आणि दायित्व अनेक स्तरावर निदर्शनास येत असताना तळागाळातील स्त्रियांसाठी दमदार कार्याची आखणी व अंमलबजावणी करणारे *सख्य महिला मार्गदर्शन केंद्र* निश्चितच आश्वासक वाटचाल करीत आहे. ध्येय निश्चिती करून ध्येयपूर्तीसाठी प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीं असो वा संस्था ,काळाच्या पडद्यावर आपला चिरंतन ठसा उमटवितात. *सख्य महिला मार्गदर्शन केंद्राची* ही सकारात्मक वाटचाल अविरत रहावी यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा !

**श्री. जॉन डिमाँटी**

# Simple steps to enhance women's empowerment.

- **Ms. Vijayshree Iyyangar,** Ex Director of Sakhya

Empowerment and equal contribution of women in the development of self and nation is the key to achieving Sustainable Development agenda 2030. It is important to first mention, the contribution of women's women across the globe to bring to the forefront the social, economic, cultural, legal and political status of women. The decades of struggle have brought about significant changes at the policy level in various significant areas. If we specifically talk about India, we have seen amendments in dowry laws, sexual abuse, domestic violence to name a few. At the national level the setting, up of the National Commission for Women primary goal is to advocate women's rights and evaluate laws related to women. Other than that, to name a few, reservation of seats for women in politics, setting up of family courts and bringing a law to address sexual harassment at workplace have been some bold steps towards women's empowerment.

The contribution of various women's organisations across India needs a special mention Their activism, concerted efforts of joint action and proactive steps at the grassroot level have led to recognising **'women's rights as human rights'**. Way forward, every intervention needs to be sustainable and women led. Development with active leadership from women should be the conscious focus of intervention. Allow and initiate interaction of women with each other in the local communities. Self-help groups are the best in bringing women under one gamut. Women who have accomplished certain milestones should be motivated to be part of such groups. A very simple and practical doable steps are:

Move from 'I will help you' to 'you find solutions to your problem, we are with you'.

Form small actions groups in the communities, train them on identifying issues, violence cases and educate them on how to report cases, what services are available in and around that they can avail of and these also become vigilant groups to prevent discrimination.

Brainstorm with them on what kind of sustainable livelihood models could be initiated at the community level. Our experiences have shown, women when they get economically empowered, they are able to take bold steps.

Financial literacy is a must. This will enable women to have better control of their lives.

Finally, when women are empowered, they are able to make better choices in all the aspects of their lives.

---

# Future endeavors for Sakhya

- Community approach – having animators at grass root level to create leadership and sustainability of our work.
- Having Shelter home for women victims of violence.
- Working with Police department – conducting awareness programs on legal matters like Domestic violence Act, POCSO Act, SHW and counseling. Being member of the Vigilant Committee at every Police station and attending their meetings and handling the cases.
- Building group of volunteers for Sakhya.
- Net working with other likeminded NGO's and working for Advocacy.
- Having full time lawyer at Sakhya's office who will take up the cases of Sakhya.
- Sakhya can be service provider in Domestic violence cases.
- Working for the empowerment of women.
- Working with and for men those are victims of violence , needs counseling.

**Ms. Regina Menezes,** Ex Director of Sakhya

# सहामाही अहवाल

## प्रशिक्षण कार्यक्रम

**लिंगभाव समानता आणि महिला सक्षमीकरण :**

भारतीय समाजात आजही स्त्री-पुरुष असमानता आहे. आणि बहुतेक महिलांना त्यांच्या मूलभूत अधिकारांची आणि घटनेने दिलेल्या समानतेची जाणीव देखील नाही. त्यादृष्टीने जनजागृती करण्याच्या तसेच लिंग भेदावर आधारित महिलांवर होणारी हिंसा ह्याबाबतीत जागृत करण्याहेतूने पुष्पांजली डी. एड्. कॉलेज, पापडी आणि संत तेरेसा डी. एड्. कॉलेज, सांताक्रूझच्या विद्यार्थ्यींनी सोबत प्रशिक्षण घेण्यात आले आणि स्त्री-पुरुष समानता आणि महिला सक्षमिकरण ह्यांचा परस्पर संबधाबद्दल मार्गदर्शन केले तसेच महिला सक्षमिकरणाच्या हेतूने महिलांसाठी असलेले कायदे व योजना ह्याबाबत माहिती दिली. सामाजिक, आर्थिक व राजकीय, जातीय आणि लिंग आधारीत भेदभावाच्या दुष्ट पकडीमधून मुक्तता कशी करता येईल याबाबत चर्चा करण्यात आली.

**परिचारिका कार्यशाळा - रूग्णालयीन कर्मचाऱ्यांकरीता कार्यशाला**

* ठाणे जिल्हा सामान्य रूग्णालय येथील नर्सिंग विद्यार्थ्यांकरीता ताणतणाव नियोजन ह्या विषयावर मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित केली होती, त्यामध्ये कामाचा ताण आणि त्याची कारणे आणि उपाययोजना ह्यासंदर्भात मार्गदर्शन केले.

* महिला सक्षमीकरण म्हणजे काय, स्त्री पुरुष समानता आणि महिला सक्षमीकरण ह्यांचा परस्पर संबंध ह्या विषयी चर्चा करून त्या दृष्टीने सरकारमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना आणि कायदे ह्याविषयी माहिती दिली.

* वसई विरार शहर महानगरपालिका रूग्णालय चंदनसार व तुळींज येथील आयाबाई आणि नर्सिंग स्टाफ ह्यांच्या करीता घरगुती हिंसा आणि रूग्णालयीन कर्मचारी यांची भूमिका स्पष्ट करणारे चर्चासत्र घेण्यात आले तसेच घरगुती हिंसा प्रतिबंधक कायदा २००५ ह्याविषयी माहिती देण्यात आली.

**सोशल मिडिया आणि त्याचा परिणाम :** सोशल मिडिया आणि सायबर गुन्हे ह्याचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन सायबर गुन्हे म्हणजे काय, त्याचे प्रकार, महिला-मुलींवर होणारा परिणाम, खबरदारी आणि तक्रार प्रक्रीया ह्याविषयी आदिवासी मुलींचे शासकीय वस्तीगृह,गिरीज येथे प्रशिक्षण देण्यात आले तसेच जिल्हा परिषद शाळा, पेल्हार, आचोळे व गोन्सालो गार्सिया स्कूल, गास येथील विद्यार्थ्यांसोबत चर्चासत्र घेण्यात आले. तसेच नेहरू नगर ठाणे मधील महिलांनादेखील ह्या विषयी जागृत करण्यात आले. तसेच ठाण्यातील TMC स्कूलमधील विद्यांर्थ्यांनाही मार्गदर्शन करण्यात आले.

**पथनाट्य कार्यशाळा :** वस्तीतील महिलांना आणि सख्य संस्थेच्या हितचिंतकाच्या मदतीने समाजात जगजागृती करण्याच्या हेतूने महिलांना पथनाट्याचे प्रशिक्षण देण्याकरीता कार्यशाळा आयोजित केली होती, ज्यामध्ये वसईतील प्रसिद्ध पथनट्याकार श्री. जुराण लोपीस व श्री. मॅक्सवेल रोझ ह्यांना आमंत्रित करण्यात आले होते, ह्यात महिलांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला.

**लिंगसमानता, समान न्याय आणि व्हॉलेंटिअर :** समाजात स्त्रीपुरुष समानता व समान न्याय प्रस्थापनेच्या कार्यात व्हॉलेटियर्सचा सहभाग कसा वाढवू शकतो आणि समाज उन्नतीत त्याचा कसा उपयोग होईल ह्याविषयी माहिती देणारे चर्चासत्र वसई धर्मप्रांताच्या युवक वर्गासाठी घेण्यात आले.

**महिला संबधीत कायदे :** एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प वसई व पालघर यांनी आयोजित केलेल्या हालोली, सावरा व मालजी पाडा येथील महिला मेळाव्यात महिला संबंधीत असलेले कायदे ह्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. घरगुती हिंसा प्रतिबंधक कायदा २००५, छेडछाड विरोधी कायदे, कामाच्या ठिकाणी महिलांवरील होणारी लौंगिक हिंसा प्रतिबंधक कायदा २०१३ ह्या कायद्यांसोबतच NC, FIR, OFIR, पोलिस स्टेशन संदर्भातील अधिकार ह्यासोबतच मनोधैर्य योजना याबाबत माहीती दिली.

**कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारी लैंगिक हिंसा प्रतिबंधक कायदा २०१३ :** अंतर्गत सख्य संस्था RBI बँक कुलाबा, नरिमन भवन तसेच RBL बँक, Fourth Signal, Kevur Kitchenware, Kunal Wear House फिरकी ह्या ठिकाणी असलेल्या अंतर्गत समितीची मिटींग घेण्यात आली तसेच सर्व कर्मचारी वर्गासाठी जनजागृती व चर्चात्मक पद्धतीने कार्यशाळा घेण्यात आली.

## मान्यवरांची भेट

* निर्मला इन्स्टीट्यूटच्या प्रेसिडेन्ट मिस. फिलोमिना

सिक्वेरा ह्यांनी सख्यच्या कामाचा आढावा घेण्याकरीता संस्थेला भेट दिली. तसेच 'संगणक कौशल्य''प्रशिक्षणाचे उद्घाटन देखील केले.

* Fourth Signal ह्या कंपनीच्या टिमने सख्यच्या कामाचा आढावा घेण्याच्या दृष्टीने सफाळेमधील कपासे, मानपाडा, ठाकूरपाडा, उंबरपाडा व रोडखड आणि रोडखड डॉम्पला भेट दिली.

## अभ्यास दौरा

* वस्तीपातळीवर राबविण्यात येणाऱ्या योजना व वस्ती कार्य पार पाहत असताना येणाऱ्या अडचणी ह्या संदर्भात माहिती घेण्याकरीता सख्य संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा अभ्यासदौरा कोलाड रायगड येथे आयोजित करण्यात आला.

* रोजगार निर्मिती करताना येणाऱ्या अडचणी व उपाययोजना, व्यवसाय कसा निवडावा ह्यासंदर्भात जाणून घेण्याकरीता युसूफ मेहरअली सेंटर, तारागाव पनवेल येथे भेट दिली.

* चैतन्य संस्था व सुर्या ग्रामीण महिला व युवक बहुउद्देशीय सामाजिक संस्था ह्या संस्थेला भेट देऊन कौशल्य प्रशिक्षण व रोजगार उपलब्धता ह्याविषयी जाणून घेतले.

**कर्मचारी क्षमता वृद्धी**

* कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारी लैंगिक हिंसा अधिनियमि २०१३ अनुषंगाने सख्य ज्या अंतर्गत समितीमध्ये समाविष्ट आहे, त्या ठिकाणी केसेस हाताळताना येणाऱ्या अडचणी आणि त्या कश्या सोडवाव्यात ह्या संदर्भात ॲड. रूशिला रिबेलो यांनी चर्चात्मक पद्धतीने कार्यशाळा घेतली.

* सोशल मिडियाचा उपयोग आपले काम प्रभाविपणे मांडण्याकरीता कसा उपयोग करता येईल तसेच आपल्या कामाकरीता CSR चा कसा उपयोग करून घेता येईल याकरीता मॉटफोर्ट केअरने आयोजित केलेल्या कार्यशाळेत सख्य संस्थेने सहभाग घेतला.

* प्रभावी संभाषण कौशल्य आणि अहवाललेखन कसे करावे ह्यासंदर्भातच श्री. गॉडफ्री यांनी सख्य कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

## विशेष कार्यक्रम

**सपोर्ट ग्रुप प्रोग्राम आणि दिवाळी मेळावा:** समाज सेवा मंडळ, निर्मळ येथे सख्य संस्थेने दिवाळीनिमित्त खास कार्यक्रमाचे आयोजन केले होते, ज्यामध्ये घरगुती हिंसाचाराने पिडित महिला ज्या समुपदेशनानंतर सक्षम होऊ पाहत आहेत आणि ज्या सख्यच्या कार्याला नेहमी सहकार्य करतात अशा महिलांना आमंत्रित केले होते. ह्या कार्यक्रमात प्रा. रमेश क्रास्टो ह्यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्रत्येकाच्या आयुष्यात समस्या असतात पण अंधारातून जसा प्रकाशामुळे मार्ग काढता येतो तसा प्रत्येकजण आपल्या समस्येवर मात करून आपले जीवन प्रकाशमय व आनंदमय करू शकतात असा संदेश दिला. तर श्री. जॉन ह्यांनी अवयवदाना संदर्भात माहीती दिली. Tech-Mahindra च्या मिस. निकिता व माविमच्या सौ. रुपाली जाधव ह्यांनी महिलांना कौशल्य प्रशिक्षण आणि उद्योजकता विकास संदर्भात मार्गदर्शन केले. उपस्थितांकरीता ह्या निमित्ताने विविध मजेशीर खेळाचे आयोजन केले होते.

तसेच Tech Mahindra यांच्या सहकार्याने ज्या महिलांना Housekeeping चे ट्रेनिंग देऊन जॉब मिळाला त्या महिलांना प्रशस्तीपत्रक देण्यात आले. ठाण्यातील नेहरू नगरमध्ये देखील अशाप्रकारे Supper Group प्रोग्राम साजरा करण्यात आला.

*** संगणक कौशल्य प्रशिक्षण :**

Slice प्रोजेक्टच्या सहाय्याने वस्तीतल्या मुलांकरीता संगणक प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आले.

**आर्थिक साक्षरता :** ठाण्यातील वाल्मिकी पाडा येथे आर्थिक साक्षरता ह्या विषयावर मार्गदर्शन करणारी कार्यशाळा राबविण्यात आली तसेच सहभागींचे पोस्टात बचत खाते व सुकन्या योजनेचे खाते उघडण्यात आले.

**'अभया' एकपात्री नाटकाद्वारे सकारात्मक संदेश :** सख्य संस्थेने जिल्हा परिषद शाळा आचोळे नालासोपारा पूर्व येथे 'रंगकर्मी मीना नाईक' लिखित आणि दिग्दर्शित एकपात्री नाटक 'अभया' आयोजित केले होते. ह्या नाटकाचा हा १६०वा प्रयोग यशस्वीरित्या पार पडला. ज्यामुळे लैंगिक शोषणापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ (पोक्सो ॲक्ट) ह्या कायद्याबाबत जनजागृती करण्यात आली. बालकांवर लैंगिक अत्याचार होतो, परंतु त्याची चर्चा लोकलज्जेस्तव कोणत्याही प्रमुख स्थानी होत नाही, हे उपस्थित व्यक्ती किंवा जवळच्या व्यक्तीने केलं असते परंतु तक्रार केली जात नाही आणि गुन्हेगार उजळ माथ्याने समाजात वावरत असतो. त्याचे चारित्र्य पडद्या आडच राहते. बालकांवर होणारे लौंगिक अत्याचारात गुन्हेगाराला

पोक्सो (प्रोटेक्शन ऑफ चिल्डन फ्रॉम सेक्स्शुअल आफिन्सेस) कायद्या अंतर्गत शिक्षा होऊ शकते, होत आहे. परंतु ह्या कायद्याबाबत समाजात जागृती होणे आवश्यक आहे. ह्या अनुषंगाने 'अभया' नाटकात हे महत्वपूर्ण विषय सामील केले गेले आहे. या प्रयोगात एका शालेय मुलीवर झालेला अत्याचार, आघात, त्या विरोधात अभया नावाच्या मुलीने दिलेला लढा, तिचा संघर्ष, त्यासाठी पालकांनी दिलेला पाठिंबा, पोलीस यंत्रणा, रुग्णालय, स्वयंसेवी संस्थेमार्फत सहाय्य, न्यायप्रकीया हे सर्व सकारात्मक पद्धतीने दाखविण्यात आले.

लहान मुलांवर अत्याचार होऊन त्या विरोधात आवाज उठवणं आणि तक्रार करणे महत्त्वाचं आहे कारण हे मुलांच्या मनावर खोलवर परिणाम करतात, आणि बालकाचे संपूर्ण आयुष्य उद्‌धवस्त होते. गुन्हेगाराविरुद्ध तक्रार करणे आवश्यक आहे, त्यासांठी निर्मित केलेले नाटक हे सकारात्मक संदेश देणारे आहे.

**दिनदर्शिका विमोचन :** आंतरराष्ट्रीय महिला हिंसा निर्मुलन मोहिमेनिमित्ताने सख्य संस्थेने संत गोन्सालो गार्सिया स्कूल, गास येथे शाळेचे मुख्याध्यापक फा. विजय लोबो यांच्या हस्ते दिनदर्शिका २०२४ चे विमोचन करण्यात आले. ह्याकरीता सख्यच्या संचालिका सि. नॅटी लोपीस व निर्मला निकेतन कॉलेज ऑफ सोशल वर्कचे विद्यार्थीदेखील उपस्थित होते. ह्या दिनदर्शिकेचा उद्‌देश केंद्रशासन, महाराष्ट्र शासन, महिला व बालकल्याण विभाग वसई विरार महानगरपालिका आणि भारतीय डाक विभाग ह्यांच्या मार्फत महिला, किशोरवयीन मुली, बालके आणि जेष्ठ नागरिकाकरीता असलेल्या योजनांबाबत जनजागृती करणे हा आहे.

ह्या कार्यक्रमानिमित्त शाळेच्या विद्यार्थ्यासोबत सायबर गुन्हा आणि सुरक्षा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

* **बालदिन :** सेंट तेरेसा डी. एड कॉलेज सांताक्रूझ येथील विद्यार्थ्यांनी सख्याच्या नविन कार्यक्षेत्र असलेल्या सफाळेमधील नारोडा, उंबरपाडा, कपासे, मानपाडा, ठाकूरपाडा येथे व्हिजिट केली. मुलांसोबत आणि महिलांसोबत विविध मनोरंजनात्मक व माहितीपर उपक्रम राबविले.

तसेच गास डोंगरी येथे स्वच्छता मोहीम राबवून मुलांसोबत बालदिनाचा कार्यक्रम घेतला.

* **स्वसंरक्षण :** छेडछाड व अपहरणाऱ्या वाढत्या केसेस लक्षात निर्मला निकेतन कॉलेज ऑफ सोशल वर्कच्या विद्यार्थ्यांना सख्य मार्फत नूतन विद्यालयमधील शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थीनीकरीता स्वसंरक्षणाचे धडे देणारी कार्यशाळा आयोजित केली होती.

* **उपजिविका उपक्रम :** उपजिवेकेचे साधन मिळून रोजगार निर्मिती व्हावी, महिलांना मानाने समाजात जगता यावे ह्या उद्‌देशाने सख्य संस्थेने भुईगाव, गिरीज भडाले पाडा, सफाळे उंबरपाडा, आगाशी धोबीतलाव येथील महिलांना कोंबडीची पिल्ले दिली तसेच शेती करणाऱ्या महिलांना बियाणे वाटप केली.

* **स्पोर्टस डे :** ठाकूर पाडा मानपाडा कपासे गावातील महिलांसोबत विविध मजेशीर खेळांचे आयोजन केले होते. महिलांनी ह्यात उत्स्पुर्त सहभाग घेत आनंद लुटला. एक दिवसाकरीता सगळ ताणतणाव विसरून मनमुराद खेळ खेळत होत्या. सोबत बक्षिस घेऊन आनंद द्विगुणीत केला.

* **कौशल्य प्रशिक्षण :** सफाळे मधील उंबरपाडा व रोडखड ह्या गावांमध्ये Fourth Signal च्या मदतीने कौशल्य प्रशिक्षण महिलांकरीता देण्यात आले. निर्मला निकेतन कॉलेज ऑफ होम सायन्सच्या विद्यार्थीनी त्यांच्या दोन प्रोफेसरसह महिलांना प्रशिक्षित करीत होत्या जेणेकरून महिला हे शिक्षण घेऊन त्याचा उपयोग रोजगार निर्मिती करीता प्रयत्न करतील. टाय ॲण्ड डाय, ब्लॉक प्रिन्टींग, फाब्ररिक प्रिन्टींग, फाब्ररिक ज्वेलरीचे प्रशिक्षण दोन दिवसात देण्यात आले.

* **गटबांधणी व प्रभावी नेतृत्व :** महिला व बालकल्याण विभाग पालघर व सख्यच्या संयुक्त विद्यमाने पालघर जिल्ह्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्पच्या सर्व मुख्य सेविकाकरीता गट बांधणी व प्रभावी नेतृत्व ह्या विषयांवर कार्यशाळा आयोजित केली होती. ह्यांचा फायदा दैनंदिन काम करताना अंगणवाडी सेविकांकडून काम करून घेताना कसा उपयोग करता येईल ह्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

## वस्ती कार्य

* **घरगुती हिंसा :** घरगुती हिंसा म्हणजे काय, त्याचे प्रकार, महिलांवर त्याचा होणारा परिणाम, संदर्भातील कायदा ह्या संदर्भात सविस्तर माहिती देणारे चर्चासत्र आगाशी, धोबीतलाव, चिंचपाडा, प्रगतीनगर, संतोषभुवन, भूईगाव येथे घेण्यात आले. तसेच ICDS अंगणवाडी सेविकांकरीता सफाळे, केळवे, माहिम येथे देखील ह्याविषयी जागृती करण्यात आली.

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प पालघरने दांडी, तारापूर, वरई येथे आयोजित केलेल्या महिला मेळाव्यात

घरगुती हिंसा प्रतिबंधक कायदा २००५ ह्याविषयी मार्गदर्शन केले.

**- बाल दिन :** गास डोंगरी, मालई तलाव व सुळेश्वर पाडा येथे मुलांच्या गटासोबत, खेळ, गाणी, डान्स व स्पीचच्या माध्यमातून बालदिन साजरा करण्यात आला.

**- महिला सक्षमीकरण :** YMCA ने आयोजित केलेल्या कार्यक्रमात महिला सक्षमीकरण म्हणजे काय आणि गरज ह्याविषयी महिलांना मार्गदर्शन करण्यात आले.

बहारे तलासरी येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात महिलांच्या समस्या आणि महिला सक्षमीकरण ह्याबाबत चर्चा करण्यात आली.

**- बाल लैंगिक शोषण व POCSO ACT :** बाल लैंगिक शोषण म्हणजे काय, त्याचे प्रकार, मुलीवर होणारा परिणाम, कायदेशीर मदत, ह्याबाबत जिल्हा परिषद शाळा, तुळींज, पेल्हार, आचोळे, मनवेल पाडा, बिलालपाडा ह्या शाळांमध्ये जनजागृती करण्यात आली.

**- वयात येताना :** पौंगाडाव्यस्थेत शारीरिक, मानसिक, भावनिक बदल, ह्यामुळे येणाऱ्या समस्या, मासिक पाळी, मासिक पाळी दरम्यानची स्वच्छता, पोषण आहार ह्याविषयी जिल्हा परिषद शाळा, तुळींज, मनवेलपाडा, मार्गदर्शन करण्यात आले.

## जनजागृती मोहीम

२५ नोव्हेंबर घरगुती हिंसा विरोधी दिन ते १० डिसेंबर मानव अधिकार दिन ह्या १६ दिवसांच्या आंतरराष्ट्रीय महिला हिंसा निर्मुलन मोहिमेत सख्य संस्थेनेदेखील आपला सहभाग विविध जनजागृती उपक्रमाद्वारे नोंदविला.

**माहिती पत्रके वाटप :** ठाण्यातील मार्केट, इंदिरा नगर, गावदेवी, तसेच वसईतील सोपारा, पापडी आठवडी बाजार, अंबाडी रोड मार्केट, झेंडाबाजार, वसई बस डेपो, पारनाका, नालासोपारा (पूर्व) बाजार, पाचआंबा येथे माहिती पत्रके देऊन जनजागृती करण्यात आली. तसेच वसई विरार शहर महानगरपालिका रुग्णालय तुळींज व डि.एम पेटीट रूग्णालयातही माहितीपत्रके देण्यात आली. चर्चगेट ते विरार दरम्यान ट्रेनमध्येही जनजागृती केली.

*** रॅली :** ठाण्यातील वाल्मिकी नगर व नालासोपारा भीमडोंगरी येथे रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ह्यामध्ये विभागातील किशोरी मुली, महिला ह्यांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला. पोस्टर व घोषणा देऊन रॅलीचा जनजागृतीचा उद्देश सफल केला.

*** पथनाट्य :** घरगुती हिंसाचाराबाबत जागृती करणारे, पथनाट्य पालघर जिल्हा परिषद व पंचायत समिती येथे निर्मला निकेतनच्या विद्यार्थ्यांनी सादर करून जनजागृती केली.


प्रशिक्षण कार्यक्रम


वयात येताना चर्चासत्र


उपजीविका सहाय्य


SHW मिटींग - RBI


उपजीविका सहाय्य


अंगणक कौशल्य


मुलांसोबत चर्चासत्र


सफाळे


जनजागृती मोहीम

# भरोसा सेल समुपदेशकांची हितगुज

**सौ. शेरील परेरा**

भरोसा सेल हा मीरा भाईंदर वसई विरार पोलिसांचा विशेषतः महिला आणि वृद्धांना प्रभावित करणाऱ्या घरगुती वादांमध्ये समुपदेशाद्वारे मध्यस्थी करण्याचा उपक्रम आहे. भरोसा सेलद्वारे "समाजाभिमुख पोलिसिंग" या कल्पनेतून विश्वास आणि मानसिक आधार देऊन घरगुती भांडणे, गैरसमज, घरगुती हिंसाचार यशस्वीपणे हाताळण्याचा प्रयत्न केला जातो.

लैंगिक शोषण किंवा इतर प्रकारच्या हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलेला किंवा मुलीला सहज न्याय मिळत नाही. कुटुंब आणि समाजाकडून तिला तिरस्काराने वागवले जाते. हक्क मागणाऱ्या विधवा किंवा घटस्फोटित महिलांना अन्यायकारक वागणूक दिली जाते. हुंडाबळी आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणात दाद कशी व कुणाकडे मागावी हेच त्यांना समजत नाही तसेच त्यांना या काळात समुपदेशनाची देखील गरज असते. `भरोसा सेल' अशा महिलांना न्याय मिळण्यासाठीच सहकार्य करते तसेच पिडीत महिलांचे व त्यांच्या कुटुंबियांचे समुपदेशन केले जाते. समुपदेशन करून त्यांचे समाधान व समझोता न झाल्यास शेवटी गुन्हा दाखल करण्यात येतो.

`भरोसा सेल'मध्ये पोलिसांबरोबर वकील, समुपदेशक, स्थानिक कार्यकर्ते समेट घडवून आणण्यासाठी सहकार्य करत असतात. भरोसा सेल विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांना मदत करण्याचे काम करतात.

भरोसा सेलमध्ये येणारी कोणत्याही केसमध्ये साम्य नसते. प्रत्येक केसमध्ये काहीतरी वेगळे असते. महिलांचे तक्रारींचे प्रमाण जास्त असले तरी काही पिडीत पुरुषही तक्रार दाखल करतात परंतु हे प्रमाण अत्यल्प आहे. पती दारू पितो, शिवीगाळ करतो, मारहाण करतो, खर्चासाठी पुरेसे पैसे देत नाही, मुलांच्या शाळेची फी भरत नाही, माहेरच्यांशी नाते तोडण्यास सांगतो, सासरचे हुंड्यासाठी टोमणे मारतात. पती पत्नीपेक्षा आईवर विश्वास ठेवतो अशी एक ना अनेक कारणे तक्रारीत असतात.

पत्नी कामावरून आल्यावर सतत भांडत असते, संशय घेते, माहेरी निघून जाते, आई वडिलांपासून वेगळे राहण्याची मागणी करते अशा अनेक समस्यांचा पतीनांही सामना करावा लागतो.
मोबाईलचा अतिवापर, सोशल मीडियाचा प्रभाव, विवाहबाह्य संबंध, समजुतदारपणाचा अभाव, हट्टीपणा अशा कारणांमुळे वैवाहिक जीवनात ताणतणाव निर्माण झाले आहेत.

गेली दिड वर्षे मी आठवड्यातून एक दिवस सख्य संस्थेमार्फत भरोसा सेल वसई येथे समुपदेशक म्हणून कार्य करत आहे. पिडीत व्यक्तीने अर्ज दाखल केल्यानंतर त्या केस संदर्भात हजर करण्यास आवश्यक असलेल्या दोन्ही कुटुंबातील सदस्यांना नोटीस बजावण्यात येते. तारखेच्या दिवशी प्रथम पती पत्नीला एकत्र बसवून दोघांची बाजू ऐकून घेतली जाते. त्यानंतर दोघांना वैयक्तिक काही सांगायचे असल्यास स्वतंत्र समुपदेशन केले जाते . पुन्हा दोघांना एकत्र बसवून विशेषतः त्यांनाच त्यांच्या समस्येतून मार्ग काढण्यास मदत केली जाते यावेळी कुटुंबातील सदस्यांचे देखील गरजेनुसार समुपदेशन केले जाते. माझा अनुभव आहे की, आपण सुचवलेल्या मार्गापेक्षा दोघांनी एकमेकांना समजून घेऊन घेतलेले निर्णय अधिक परिणामकारक असतात. जवळजवळ ७५% केसेस मध्ये समुपदेशनानंतर समझोता झालेला आहे. काही जण मात्र मला त्याच्याबरोबर नांदायचेच नाही किंवा मला तिला नांदवायचे नाही या भूमिकेवर ठाम असतात.

एका केसमध्ये पत्नीने पती विरोधात मारहाण केल्याची तक्रार दाखल केली होती. नवरा मारहाण करतो म्हणून तिला त्याच्या बरोबर राहायचे नव्हते. दोघांची बाजू ऐकून घेतल्यानंतर नवऱ्याने मारहाण करण्याचे कारण ऐकून आश्चर्य वाटले. त्यांना तीन मुली होत्या वय वर्षे बारा, सात, व पाच. नवऱ्याला आपल्याला तीनही मुली असल्याचे अजिबात दुःख किंवा राग नव्हता. तीनही मुली दिसायला चांगल्या आणि हुशार होत्या. परंतु त्याच्या बायकोला मुलगा हवा होता. तिच्या आईकडच्या कोण्या डॉक्टरांनी औषधाने मुलगा होईल असे सांगितले होते. त्यामुळे कुटुंब नियोजनासाठी केलेले ऑपरेशन मोकळे करून मुलगा होण्यासाठी प्रयत्न करावे म्हणून ती सतत त्याला त्रास देत होती आणि मुलींना प्रेमाने वागवत नव्हती.सततच्या भांडणांमुळे वैतागून त्याने तिला मारहाण केली होती. इथे स्त्रीच स्त्रीबद्दल चुकीची धारणा घेऊन बसली होती यात तिची आईच एक मुलगा हवाच म्हणून मागे लागली होती.

तिचे समुपदेशन केल्यानंतर तिला पटले की चौथे मुल सुद्धा मुलगी असू शकते, मुलगा मुलगी दोघे सारखेच असतात इत्यादी समजावून सांगितले. तिला ते पटले मुलींबरोबर चांगले वागण्याचे तिने आश्वासन दिले व पुन्हा हात उचलणार नाही. गरज भासल्यास पुन्हा समुपदेशनासाठी येऊ असे सांगून दोघे आनंदाने निघून गेले.

समाजात अजूनही अनेक समज गैरसमज आहेत. अनेक बाबतीत समुपदेशनाची समाजाला गरज आहे. लग्नाअगोदर मुलामुलींची ओळख होणे, दोन्ही कुटुंबांची पुरेशी आणि खरी माहिती मिळणे, पत्रिका जुळवून बघताना स्वभाव जुळतात का ? हे पाहणे तसेच पालकांचे समुपदेशन होणे गरजेचे आहे.

# भारतात लैंगिक समानतेला गती देण्याबाबतचे मत

भारतातील स्त्री-पुरुष समानतेचा मुद्दा एक जटिल आणि आव्हानात्मक आहे, ज्यासाठी प्रगतीला गती देण्यासाठी बहुआयामी प्रयत्नांची आवश्यकता आहे. अलिकडच्या वर्षांत लक्षणीय प्रगती झाली असली तरी, अजूनही असंख्य अडथळे आणि असमानता आहेत जे लैंगिक समानतेच्या पूर्ण प्राप्तीमध्ये अडथळा आणतात. भारतातील लैंगिक समानतेला गती देण्याच्या प्रयत्नांमध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि कायदेशीर परिमाणांसह विविध पैलूंचा समावेश असणे आवश्यक आहे.

शिक्षणाद्वारे महिला आणि मुलींचे सक्षमीकरण हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे ज्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. स्त्री-पुरुष असमानतेचे चक्र तोडण्यासाठी मुलींना दर्जेदार शिक्षणाची समान सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मुलींच्या शिक्षणातील गुंतवणुकीमुळे आरोग्याचे सुधारित परिणाम, वाढलेल्या आर्थिक संधी आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अधिक सहभाग यासह महत्त्वपूर्ण सकारात्मक परिणाम होऊ शकतात.

लैंगिक समानतेला गती देण्यासाठी आर्थिक सक्षमीकरण हा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. अधिक न्याय्य समाज निर्माण करण्यासाठी महिलांमधील उद्योजकतेला चालना देण्यासाठी, आर्थिक संसाधनांमध्ये प्रवेश प्रदान करण्यासाठी आणि कर्मचाऱ्यातील लिंग-आधारित अडथळे दूर करण्याचे प्रयत्न महत्त्वाचे आहेत. यामध्ये कौशल्य विकास कार्यक्रम, मार्गदर्शन संधी आणि योग्य आणि समान रोजगार पद्धतींना प्रोत्साहन देणारी धोरणे यासारख्या उपक्रमांचा समावेश असू शकतो.

लैंगिक असमानता कायम ठेवणाऱ्या सांस्कृतिक आणि सामाजिक नियमांना संबोधित करणे देखील महत्त्वाचे आहे. हानिकारक स्टिरियोटाइपला आव्हान देणे, माध्यमांमध्ये महिलांच्या सकारात्मक प्रतिनिधित्वास प्रोत्साहन देणे आणि आदर आणि समानतेची संस्कृती वाढवणे ही लैंगिक समानतेच्या दिशेने प्रगतीला गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले आहेत. सामुदायिक सहभाग, जागरुकता मोहिम आणि वकिलीचे प्रयत्न सामाजिक दृष्टिकोन आणि नियम बदलण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

शिवाय, लैंगिक समानता सुनिश्चित करण्यासाठी कायदेशीर सुधारणा आणि अंमलबजावणी यंत्रणा आवश्यक आहेत. यामध्ये भेदभाव करणारे कायदे संबोधित करणे, महिला आणि मुलींसाठी न्याय मिळवणे सुनिश्चित करणे आणि लिंग-आधारित हिंसा आणि भेदभाव विरुद्ध कायदेशीर संरक्षण मजबूत करणे समाविष्ट आहे. याशिवाय, सर्वसमावेशक आणि न्याय्य समाजाच्या निर्मितीसाठी राजकीय आणि शासन संरचनांसह सर्व स्तरांवर निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवण्याचे प्रयत्न आवश्यक आहेत.

भारतातील स्त्री-पुरुष समानतेला गती देण्यासाठी संस्थात्मक आणि धोरण-स्तरीय बदल मूलभूत आहेत. यामध्ये सर्व धोरणे आणि कार्यक्रमांमध्ये लैंगिक दृष्टीकोन समाविष्ट करणे, प्रभावी देखरेख आणि मूल्यमापन यंत्रणा स्थापित करणे आणि लैंगिक समानता उपक्रमांना समर्थन देण्यासाठी संसाधने वाटप करणे समाविष्ट आहे. सर्वसमावेशक आणि शाश्वत बदल घडवून आणण्यासाठी सरकारी संस्था, नागरी संस्था आणि खाजगी क्षेत्र यांच्यातील सहकार्य महत्त्वाचे आहे.

स्त्री-पुरुष समानता वाढवण्यात पुरुष आणि मुलांची भूमिका निभावणे ही दुसरी महत्त्वाची बाब आहे. पुरुष आणि मुलांना या प्रवासात सहयोगी होण्यासाठी प्रोत्साहित करणे, विषारी पुरुषत्वाला आव्हान देणे आणि पुरुषत्वाच्या सकारात्मक प्रकारांना प्रोत्साहन देणे हे सर्व व्यक्तींसाठी अधिक समावेशक आणि आश्वासक वातावरण तयार करण्यात योगदान देऊ शकते.

लैंगिक समानतेला गती देण्यासाठी शिक्षण आणि जागरूकता ही महत्त्वाची साधने आहेत. लिंग-संवेदनशील शिक्षण आणि जागरूकता कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे जे रूढीवादी विचारांना आव्हान देतात, लिंग-आधारित हिंसेला संबोधित करतात आणि निरोगी नातेसंबंधांना प्रोत्साहन देतात, अधिक समावेशक आणि न्याय्य समाजाला प्रोत्साहन देऊ शकतात.

शेवटी, भारतातील लैंगिक समानतेला गती देण्यासाठी सरकारी संस्था, नागरी समाज संस्था, खाजगी क्षेत्र आणि व्यक्तींसह समाजातील सर्व सदस्यांकडून एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. लैंगिक असमानतेच्या बहुआयामी आयामांना संबोधित करून आणि शिक्षण, आर्थिक सक्षमीकरण, कायदेशीर सुधारणा, सांस्कृतिक बदल आणि धोरणात्मक बदल यांचा समावेश असलेल्या व्यापक धोरणांची अंमलबजावणी करून, भारत सर्वांसाठी अधिक समावेशक आणि समान समाज निर्माण करण्याच्या दिशेने लक्षणीय प्रगती करू शकतो.

**नीता डाबरे**, समुपदेशिका

प्रेमळ स्मरणार्थ



## ख्रि. सिलू ब. फोस

देणार : फातिमा जॉर्ज डिसोजा

१५ व्या वाढदिवसानिमित्त
देवाचे आभार



## शर्वी

देणार : सायली पाटील

'WE WISH YOU A NON-VIOLENCE FREE YEAR 2024'



**From :**

**JUSTICE & PEACE COMMISSION,**

**Prison Ministry Mumbai & Office for Environment**


रुग्णालयीन Crap
कर्मचाऱ्यांकरीताकार्यशाळा
भरोसा सेल
SHW कार्यशाळा
मुलींसोबत चर्चासत्र
उपजीविका कार्यशाळा
स्वसंरक्षण
वस्तीकार्य
अभया
दिनदर्शिका विमोचन


निलम
आर्ट प्रिंटर्स
कॅथलिक बँकेजवळ, आक्टण-सांडोर, वसई (प.)
मो. ९८८१०९१३२०
सर्व तऱ्हेची हॉस्पिटल, चर्च, स्कूल, ऑफीस,
बँक स्टेशनरी माफक दरात मिळण्याचे ठिकाण